रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८७ ▌अंक ३४३ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## महाराष्ट्र भाजपामुक्त होणार : पटोले

**मुंबई :** नागपूर : राज्यात उद्या सोमवारी शेवटच्या टप्प्यातील मतदान होत आहे. मतदानात महाविकास आघाडीच्या बाजूने कौल दिसेल. भाजपला महाराष्ट्रातूनच महाराष्ट्र मुक्त करण्याचं शेतकरी, गोरगरिबांनी ठरवलेलं आहे, असं वक्तव्य काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केलं आहे. पटोले म्हणाले, या निवडणुकांमध्ये सत्तेतील भाजपने मागील दहा वर्षांत विकास केला असा आव आणण्याचा प्रयत्न केला. पण विकास न केल्यामुळे ते सांगण्यात अपयशी ठरले. पान २ वर

रायगड, सोमवार, दि. २० मे २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## मतदान आकडेवारीवर संशय

**नवी दिल्ली :** नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्याची आकडेवारी मतदानाच्या ४८ तासांच्या आत जाहीर करा, या मागणीच्या याचिकेवर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. न्यायालयाने याचिकेची गंभीर दखल घेत सात दिवसांत उत्तर देण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले आहेत. सरन्यायाधीश डॉ. डी.वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर याप्रकरणी सुनावणी झाली. देशात लोकसभा निवडणूक पान २ वर

### राज्यात आज अंतिम टप्प्यातील मतदान

# दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला

## देशात ४९ तर राज्यात १३ मतदारसंघात मतदान

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या राज्यातील पाचव्या आणि अंतिम टप्प्यातील मतदान सोमवार, दि. २० मे रोजी पार पडणार असून अनेक दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. राज्यातील एकूण १३ मतदारसंघांसह देशातील ८ राज्यांतील ४९ जागांसाठी मतदान होणार आहे. बहुतांश मतदारसंघांमध्ये महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगणार आहे. तर अनेक ठिकाणी तिरंगी लढत होणार आहे. शनिवारी सायंकाळी अंतिम टप्प्यातील प्रचाराच्या तोफा थंडावल्या. दरम्यान, सोमवारी या सर्व मतदारसंघातील मतदारांचं भवितव्य मतपेटीत बंद होणार आहे. पान २ वर




### चुरशीच्या लढती :

**दक्षिण मुंबई :** अरविंद सावंत (ठाकरे गट)– यामिनी जाधव (शिंदे गट) **दक्षिण मध्य मुंबई :** अनिल देसाई (ठाकरे गट)– राहुल शेवाळे (शिंदे गट) **उत्तर पश्चिम मुंबई :** अमोल कीर्तिकर (ठाकरे गट) – रवींद्र वायकर (शिंदे गट) **उत्तर मुंबई :** भूषण पाटील (काँग्रेस) –पियूष गोयल (भाजपा) **उत्तर मध्य मुंबई :** वर्षा गायकवाड (काँग्रेस) –उज्ज्वल निकम (भाजपा) **ईशान्य मुंबई :** संजय दिना पाटील (ठाकरे गट) – मिहीर कोटेचा (भाजपा) **ठाणे :** राजन विचारे (ठाकरे गट) – नरेश म्हस्के (शिंदे गट) **कल्याण :** वैशाली दरेकर (ठाकरे गट) – श्रीकांत शिंदे (शिंदे गट) **भिवंडी :** सुरेश म्हात्रे (मविआ) – कपिल पाटील (भाजपा) **पालघर :** भारती कामडी (ठाकरे गट)– डॉ. हेमंत सावरा (भाजपा) **नाशिक :** राजाभाऊ वाजे (ठाकरे गट) – हेमंत गोडसे (शिंदे गट) **दिंडोरी :**भास्कर भगरे (मविआ) – डॉ. भारती पवार (भाजपा) **धुळे :** शोभा बच्छाव (काँग्रेस)– डॉ. सुभाष भामरे (भाजपा)

### पाचव्या टप्प्यात देशात किती मतदारसंघ?

उत्तर प्रदेशातील १४, महाराष्ट्रातील १३, पश्चिम बंगालमधील ७, बिहारमधील ५, ओडिशातील ५, झारखंडमधील ३ आणि जम्मू-काश्मीर आणि लडाखमधील प्रत्येकी एका जागेसाठी मतदान पार पडणार आहे.

### राज्यात कुठे मतदान?

धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, मुंबई उत्तर, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई उत्तर पूर्व, मुंबई उत्तर मध्य, मुंबई दक्षिण मध्य आणि मुंबई दक्षिण मतदारसंघात मतदान होणार आहे.

### लक्षवेधी ठरणाऱ्या लढती

काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी, केंद्रीयमंत्री राजनाथ सिंह, पीयूष गोयल आणि स्मृती इराणी, भारती पवार आणि नॅशनल कॉन्फरन्सचे ज्येष्ठ नेते ओमर अब्दुल्ला यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. राहुल गांधी हे उत्तर प्रदेशातील रायबरेली लोकसभा मतदारसंघातून उमेदवार आहेत. राजनाथ सिंह लखनौमधून, स्मृती इराणी अमेठीतून, पीयूष गोयल मुंबई उत्तरमधून आणि ओमर अब्दुल्ला बारामुल्लामधून निवडणूक लढवत आहेत.

## रायगडातून ७५ बसेस



**अलिबाग :** ठाणे आणि मुंबईमध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातून ७५ एसटी बसेस पाठविण्यात आल्या आहेत. त्यामुळे अनेक फेऱ्या रद्द झाल्याने प्रवाशांचे शनिवार व रविवारी हाल झाले. ठाणे व मुंबई लोकसभा मतदारसंघातील मतदान सोमवारी २० मे रोजी होणार आहे. त्यानिमित्ताने कर्मचाऱ्यांसह मतदान साहित्यांची केंद्रात ने-आण करण्यासाठी रायगडमधून ७५ एसटी बसेसची मागणी करण्यात आली. त्यानुसार रायगडमधून गाड्या पाठविण्यात आल्या आहेत. शनिवारपासून या गाड्या मुंबई पान २ वर

## रायगडात लागल्या पैजा



**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीत कोण बाजी मारणार यासाठी जिल्ह्यातील गल्लीबोळातील नाक्यांवर, पारांवर चांगल्याच गप्पा रंगत आहेत. अमूक उमेदवार निवडून येईल, तमूक उमेदवार हरणार असे छातीठोकपणे सांगितले जात आहे. काही ठिकाणी पैजादेखील लावल्या जात असल्याचे दिसून आले. मजेशीर बाब म्हणजे, पैज म्हणून जेवणाच्या पार्ट्यांपासून ते ढेंगेखालून जाईन इथपर्यंत पैज लावणाऱ्यांची मजल गेली आहे. रायगडची जागा कोण जिंकणार हे आता ४ जूनलाच स्पष्ट होणार आहे.

रायगडलोकसभामतदारसंघामध्ये इंडिया आघाडीतील शिवसेनेचे (ठाकरे गट) अनंत गीते आणि महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) सुनील तटकरे यांच्यामध्येच सरळ लढत होत आहे. ७ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडली असून, ६०.५१ टक्के मतदान झाले आहे. मतदार राजाने कोणाच्या पारड्यात झुकते माप टाकेलय याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे.

कोण बाजी मारणार आणि कोण हरणार याबाबतच्या चर्चा आता चांगल्याच रंगत आहेत. मोदीविरोधात सुप्त लाट असल्याने तटकरेंचा पराभव होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे, तटकरे हे जिंकूच शकत नाही, ते जिंकले तर मटण-दारुची पार्टी देतो, काही ठिकाणी ५०० रुपयांपासून पाच हजार रुपयांपर्यंत पैजा लागल्याची

**■ जेवणाच्या पार्ट्यांपासून ढेंगेखालून जाण्याची मजल**

जोरदार चर्चा ऐकायला मिळत आहे. एकाने तर तटकरे जिंकले तर ढेंगेखालून जाईन, अशी पैज लावत गीते निवडून येण्याला पसंती दिली आहे.

अलिबाग, पेण, गुहागर, दापोलीमध्ये गीते हे मताधिक्य घेतील, तर महाड, श्रीवर्धनमध्येही गीतेंनाच पसंती असल्याचे बोलले जात आहे. मराठा, ओबीसी, दलित आणि मुस्लिम मतदार भाजपावर नाराज आहेत. त्यांच्यासोबतच तटकरे गेले आहेत. त्यामुळे हे घटक तटकरेंना धडा शिकवतील, असे विषयदेखील चांगलेच चघळले जात आहेत. उध्दव ठाकरे, शरद पवार यांचा पक्ष फोडल्याने जनतेमध्ये प्रचंड चीड असल्याची चर्चा होत आहे. तर काही ठिकाणी मतदारांसाठी पैशाचा पाऊस पाडल्याचेही बोलले जात आहे. महागाई, पक्ष फोडोफोडी, बेरोजगारी, पाण्याच्या प्रश्नी सत्ताधारी अपयशी ठरले आहेत, अशा विविध विषयांवर सखोल अध्ययन होताना पाहायला मिळत आहे.

### वेधक

## पोलीस अधिकाऱ्याची दुचाकी चोरीला

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागमधील एसटी बसस्थानकात पार्किंग केलेली दुचाकी चोरट्याने गायब केली. पोलीस मुख्यालयातील अधिकाऱ्याची गाडी असल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, ती गाडी दोन दिवसांनी दुसऱ्या जागी सापडल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलीस मुख्यालयातील राखीव पोलीस उपनिरीक्षक प्रकाश मोकल यांनी त्यांची दुचाकी सोमवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या पान २ वर

## प्रतापराव भोसले यांचे निधन



**सातारा :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी कॅबिनेट मंत्री प्रतापराव भोसले यांचं रविवारी (दि. १९) सातारमध्ये निधन झाले. राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांसोबत त्यांनी काम केले होते. कॅबिनेटमध्ये अनेक मंत्रिपदे भूषवली. ते काँग्रेस माजी प्रदेशाध्यक्ष होते. प्रतापवराव भोसले यांनी चार वेळा आमदारकी जिंकताना कमी वयामध्ये आमदार होण्याचा मान मिळवला होता.

## महिलेने घातला एक कोटीचा गंडा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

कंपनीच्या ट्रेंडिंग ॲपमध्ये पैसे गुंतविण्यास भाग पाडून अलिबागमधील एका इसमाची एक कोटी सहा लाख ५६ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना घडली आहे. नुकतीच अलिबागमधील महिलेची ४० लाखांची फसवणूक केल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा एकदा एक कोटी रुपयांचा गंडा घातल्याची घटना घडली आहे. त्यामुळे ऑनलाईन फसवणुकीला पुन्हा ऊत आल्याचे दिसून येत आहे.

**अलिबागमधील दुसरी घटना**

सायबर सेलकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी महिला व फिर्यादी पुरूष यांची सोशल मीडियावर १५ जानेवारीला ओळख झाली. हळूहळू दोघांचे मैत्रीत रुपांतर झाले. त्याचा विश्वास संपादन करुन त्या महिलेने त्याला आरटीजीसी कंपनीच्या ट्रेंडिंग ॲपमध्ये एक कोटी सहा लाख ५६ हजार ९६ रुपये गुंतविण्यास सांगितले. तिच्यावर विश्वास ठेवून त्याने ती रक्कम ॲपमध्ये भरली. त्यानंतर महिलेने पान २ वर

## ...तर शर्यतीतून बैल बाद होणार!

**नवी दिल्ली :** कानाला बिल्ला नसलेल्या बैलाला शर्यतीत भाग घेता येणार नाही. तसेच बिल्ला नसल्यास पशुधनाची खरेदी विक्री ही करता येणार नाही. १ जूनपासून कानाला बिल्ला बंधनकारक असल्याचे शासनाने परिपत्रक काढले आहे. केंद्र सरकारच्या पशुसंवर्धन विभागाने 'नॅशनल डिजिटल लाईव्हस्टॉक मिशन' ही भारत पशुधन प्रणाली आणली आहे. या प्रणालीनुसार जनावराच्या कानाला एक बिल्ला लावण्यात येतो. त्यात एक १२ अंकी बारकोड असतो. यामध्ये पशुची जन्म आणि पान २ वर

## पर्यटक अडकले वाहतूक कोंडीत

### एक ते दोन किलोमीटर अंतरावर वाहनांच्या रांगा

**। प्रमोद जाधव ।**
**। अलिबाग ।**

उन्हाळी सुट्टीच्या हंगामात चाकरमान्यांसह पर्यटकांचे रायगड जिल्ह्यात आगमन सुरू झाले असून, एसटी, खासगी बसेसच्या संख्येत वाढ झाल्याने पर्यटकांना वाहतूक कोंडीचा फटका बसत आहे. मुंबई-गोवा महामार्गासह अलिबाग, पेण, अलिबाग रेवदंडा, नेरळ, माणगाव या भागात वाहनांच्या एक ते दीड किलोमीटरच्या रांगा लागत असल्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालकांसह पर्यटक त्रस्त झाले आहेत. दरम्यान, पर्यटकांना त्यांच्या निश्चित स्थळी पोहोचण्यास विलंब झाल्याने नाराजी व्यक्त करीत आहेत. आधीच उष्णतेने अंगाची लाही लाही होत असताना, रखरखत्या उन्हात तासन्‌तास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागत असल्याने पर्यटक हैराण झाले आहेत.

रायगड जिल्हा पर्यटकांच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरत आहे. येथील समुद्रकिनारा, नारळी, पोफळीच्या बागा पर्यटकांच्या कायमच पसंतीस उतरल्या आहेत. उन्हाळी सुट्टीच्या हंगामात पान २ वर



दरवर्षी सुट्टीच्या दिवशी गावी आम्ही येतो. मात्र, वेळेवर गावी पोहोचल्याचा आनंदच मिळाला नाही. दरवर्षीप्रमाणे वाहतूक कोंडीत अडकलो. त्यामुळे रस्ता रुंदीकरणावरही सरकारने भर देणे आवश्यक आहे.
– सुवर्णा जाधव, पर्यटक

मुंबई-गोवा महामार्गावरील पेण या ठिकाणी रस्त्याचे काम सुरु आहे. जिल्ह्यातील माणगाव, अलिबाग, पेण आदी मार्गांवर वाहनांच्या रांगा आहेत. वाहने संथगतीने चालत आहेत. वाहतूक कोंडी नाही. वाहतूक कोंडी सुरळीत करण्यात आली आहे.
– अनिल लाड, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा, रायगड



● स्व. अनिरुद्ध राणे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबीर शेकाप महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी सरपंच हर्षदा मयेकर व अन्य मान्यवर उपस्थित होते. (सविस्तर वृत्त पान ३ वर)

## दुचाकीस्वार ठार

**। रसायनी । वार्ताहर ।**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर वासांबे मोहोपाडा जिल्हा परिषद हद्दीतील लोधिवली गावाजवळ एका दुचाकीस्वराला अज्ञात वाहनाने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील एकाचा मृत्यू झाला, तर एक जण जखमी झाला आहे.

मुंबईहून प्रदीप भागूजी लागोत (३०, रा. अंबुखेड) हे आपल्या ताब्यातील डीओ कंपनीची दुचाकी घेऊन गावी जात असताना ते जुन्या महामार्गावरील दांडफाटा लोधिवली समुद्र महल बारजवळ आले असता त्यांना पाठमागून अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. या अपघातात ते दुचाकीसह दोघेजण बाजूच्या नाल्यात जाऊन पडले. त्यातील पाठीमागे बसलेला अतुल धोंडिबा बच्चे (३४, रा. हेंद्रज, ता. खेड, जि. पुणे) हे गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला, तर एक जखमी झाला आहे.

## रामदेवबाबांची 'सोनपापडी' कायद्याच्या कचाट्यात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बाबा रामदेव पुन्हा अडचणीत सापडले असून, पतंजलीवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. पतंजलीची सोनपापडी गुणवत्ता चाचणीत फेल झाली आहे. याप्रकरणी कारवाई करत, उत्तराखंडच्या पिथौरागढच्या पोलिसांनी तिघांना अटक केली असून, यामध्ये पतंजलीच्या सहाय्यक व्यवस्थापकाचाही समावेश आहे.

तिघांनाही अन्न सुरक्षा आणि मानक कायदा २००६ च्या कलम ५९ अंतर्गत सहा महिन्यांची शिक्षा आणि दंडही ठोठावण्यात आला आहे. सहाय्यक व्यवस्थापकाला ५० हजार, तर अन्य दोन दोषींना १० आणि




२५ हजार रुपये दंड भरावा लागणार आहे.

पाच वर्षांपूर्वी १७ ऑक्टोबर २०१९ रोजी जिल्हा अन्न सुरक्षा अधिकाऱ्याने उत्तराखंडमधील पिथौरागढ बेरीनाग मार्केटला भेट दिली. यावेळी बेरीनाग मार्केटमध्ये असलेल्या लीलाधर पाठक यांच्या दुकानावर छापा टाकण्यात आला.

## माथेरानमध्ये पाणीवाटपात दुजाभाव

### जनार्दन पारटे यांचा आरोप

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान पर्यटनस्थळी येणाऱ्या पर्यटकांसाठी उल्हास नदीवरून पाणीपुरवठा होतो.त्याचवेळी माथेरान शहरात असलेल्या शार्लोट लेक येथून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, एप्रिल, मे आणि जून महिन्याचे पहिले १५ दिवस साधारण नागरी वस्तीमध्ये कमी दाबाने पाण्याचा पुरवठा केला जातो. त्यावेळी माथेरानमधील हॉटेल व्यावसायिकांना मुबलक पाणी देण्यात येते, असा दरवर्षी आरोप होतो. मात्र, माथेरान शहरात पाणीपुरवठा करताना दुजाभाव केला जात असल्याचा आरोप येथील सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती अधिकार कार्यकर्ते जनार्दन पार्टे यांनी केला आहे.



महाराष्ट्र जीवन प्राधिकरणला पार्टे यांनी निवेदन दिले असून, त्यात माथेरान शहरात हॉटेल्स आणि नागरी वस्ती असा दुजाभाव पाणी वितरण करताना केला जात असल्याचा आरोप केला आहे. त्यावेळी पार्टे यांनी आपली भूमिका मांडताना हॉटेल्स यांना कशाप्रकारे जादा पाणी पुरवले जाते याची माहिती दिली आहे. माथेरानमध्ये पाणी वितरण करताना दुजाभाव केला जातो. याचे स्पष्टीकरण करताना २०११ साली झालेल्या जनगणेनुसार माथेरान येतील स्थानिक नागरिकांची लोकसंख्या ही ५०३९ इतकी होती. माथेरान येथील सर्व स्थानिक नागरिकांना दरडोई मुबलक प्रमाणात १०० लीटर पाणी दिले, तर पाच लाख लीटर पाणी दिले जाते. मग उरलेले १० लाख लीटर पाणी कोठे जाते. याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या पान २ वर

## शुभवर्तमान! मान्सून आला रे आला!

# अंदमानमध्ये दाखल, ३१ मेपर्यंत केरळात

### महाराष्ट्रात १२ जूनपर्यंत धो-धो बरसणार

**। पुणे । प्रतिनिधी ।**

वाढत्या तापमानामुळे आणि उन्हाच्या तडाख्याने हैराण झालेल्या नागरिकांना हवामान खात्याने आनंदाची बातमी दिली आहे. भारतीय हवामान विभागाने मान्सून १९ मेपर्यंत अंदमानमध्ये डेरेदाखल होईल असा अंदाज वर्तविला होता. त्याप्रमाणे तो अंदमान-निकोबारमध्ये पोहोचला आहे. अंदमानात स्थिरावल्यानंतर ३१ मे रोजी तो केरळमध्ये प्रवेश करेल. महाराष्ट्रात काही ठिकाणी पुढील आठवड्यात वळीवाच्या सरी कोसळणार आहेत. तर, १० ते १२ जूनदरम्यान मान्सून महाराष्ट्रात येणार आहे, असाही अंदाज वर्तविण्यात आला आहे.

मान्सूनने गेल्यावर्षी महाराष्ट्रात प्रतीक्षा करायला लावली होती. यंदा मात्र तो दोन दिवस आधीच महाराष्ट्रात येण्याची शक्यता आहे. तसेच हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार यंदा मान्सून धो-धो बरणार असून, सुमारे १०६ टक्के पाऊस होण्याचा अंदाज आहे. मान्सून दरवर्षी १ जून रोजी केरळमध्ये दाखल होतो. यंदा मात्र एक दिवस आधीच ३१ मे रोजी मान्सून केरळमध्ये येत आहे.



मान्सून हा केरळमध्ये येण्यापूर्वी अंदमान आणि निकोबार बेटांवर शिरकाव करतो. दरवर्षी २१ मे रोजी या बेटांवर मान्सून येत असतो. मात्र, यंदा १९ मे रोजी अंदमान-निकोबार बेटांवर तो धडकत आहे. गेल्या वर्षी मान्सून केरळमध्ये ९ दिवस उशिराने म्हणजे ८ जूनला दाखल झाला होता. तर महाराष्ट्रात तो १९ जूनला आला होता. यंदा मान्सून महाराष्ट्रात १० ते १२ जूनपर्यंत येण्याची शक्यता आहे.

### 'ला निना'मुळे चांगला पाऊस

गेल्या वर्षी 'अल निनो' सक्रिय होता, तर यंदा तो संपुष्टात येत आहे. गेल्यावर्षी 'अल निनो'मुळे सामान्यापेक्षा कमी पाऊस झाला, यंदा मात्र 'ला निना'मुळे चांगला पाऊस होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. ला निना असेल तर चांगला पाऊस होतो, असे आतापर्यंत दिसून आले आहे. त्यामुळे यंदा १०६ टक्के पाऊस होण्याचा अंदाज आहे. आता आठवडाभर महाराष्ट्रात उष्णतेच्या लाटेसह तुरळक ठिकाणी ढगाळ वातावरण आणि अवकाळी पावसाची शक्यता आहे. २७ मेपासून राज्यभरात पूर्वमोसमी म्हणजेच वळीवाच्या पावसाला सुरुवात होणार आहे.




# तीन जागा, ७९ उमेदवार, सात जणांमध्ये चुरस

। ठाणे । वृत्तसंस्था ।

लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवाचे काऊंटडाऊन सुरू झाले असून आज ठाणे जिल्ह्यात मतदान होत आहे. पाचव्या टप्प्यात ठाणे जिल्ह्यात होणाऱ्या ठाणे, कल्याण व भिंवडी लोकसभा मतदारसंघातून संसदेत जाण्यासाठी तब्बल ७९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यात प्रमुख सात उमेदवारांमध्ये कांटे की टक्कर आहे. त्यामुळे चुरस शिंगेला पोहोचली आहे. दरम्यान, महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी तिन्ही मतदारसंघात थेट लढत असली तरी दोन ठिकाणी शिवसेनेच्या दोन्ही गटांचे उमेदवार एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. या सर्वांचे भवितव्य सोमवारी (ता.२०) मतदार मतदान यंत्रात बंद होणार आहे.

ठाणे लोकसभा मतदारसंघात २४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. यामध्ये शिवसेना शिंदे गटाचे नरेश म्हस्के विरुद्ध शिवसेना ठाकरे गटाचे विद्यमान खासदार राजन विचारे यांच्यात थेट लढत आहे. ही लढाई अस्तित्वाची आणि प्रतिष्ठेची मानली जात आहे. हे दोन्ही उमेदवार मूळचे शिवसैनिक असून एकेकाळी एकत्र काम केलेले आहे; मात्र शिवसेनेत दोन गट पडल्यानंतर दोघे एकमेकांचे कट्टर विरोधक बनले आहेत. मतदारसंघात एकूण २५ लाख सात हजार ३७२ मतदार आहेत. ५१ टक्के मराठी आणि उर्वरित इतर भाषिक मतदार येथे आहेत. सत्तेचा धनुष्यबाण विरुद्ध निष्ठेची मशाल असे या निवडणुकीला रंग देण्यात आला आहे.

**कल्याणच्या गडाकडे लक्ष**

कल्याण लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक २८ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. यात शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार विद्यमान खासदार डॉ. श्रीकांत शिंदे विरुद्ध शिवसेना ठाकरे गटाच्या वैशाली दरेकर- राणे यांच्यामध्ये प्रमुख लढत आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे गटाकडे असलेल्या मोजक्या पदाधिकाऱ्यांची ताकदही कमकुवत करण्यात आली आहे. त्यामुळे एकीकडे झंझावात प्रचार तर दुसरीकडे प्रचारात कार्यकर्त्यांची वानवा अशी परिस्थिती येथे पाहायला मिळाली. या



निवडणुकीत आतापर्यंत मिळालेल्या मतांचा विक्रम मोडणार, असा दावा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केला आहे. तर दुसरीकडे ठाकरे गटाने महिला कार्ड खेळून महिला मतदारांच्या सहानुभूतीसह मते मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.

भिवंडी लोकसभा मतदारसंघात २७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यात महायुतीचे विद्यमान खासदार कपिल पाटील विरुद्ध महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेश उर्फ बाळ्या मामा म्हात्रे यांच्यात प्रमुख लढत आहे; मात्र या दोघांनाही अपक्ष उमेदवार नीलेश सांबरे यांचे आव्हान असल्याचे मानले जाते.

गेल्या दहा दिवसांच्या प्रचारात कपिल पाटील यांच्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रचारसभा घेतली. तर बाळ्या मामांसाठी शरद पवार यांनी तीन सभा घेतल्या. शेवटच्या दिवशी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सभा घेत बाजी पलटवल्याचे म्हटले जात आहे. ७९ उमेदवारांमध्ये सहा उमेदवार हे प्रमुख पक्षांचे आहेत. यात शिवसेना शिंदे गटाचे दोन, ठाकरे गटाचे दोन, भाजपचा एक आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचा एक उमेदवार आहे.

याशिवाय ४५ उमेदवार हे अपक्ष असून उर्वरित सपा, एमआयएम, भीम सेना आदी छोट्या पक्षाचे आहेत. यात १३ महिला उमेदवारही आहेत. निवडणुकांच्या आतापर्यंतच्या इतिहासात एकाही छोट्या अथवा अपक्ष उमेदवाराला अपेक्षित यश मिळालेले नाही. मात्र, प्रत्येक उमेदवाराने ५०० ते तीन हजार मते घेतली आहेत. त्यामुळे या अपक्षांच्या खात्यात जाणाऱ्या मतांचा फटका कोणाला बसणार, हे पाहावे लागणार आहे.

**नोटाची शक्यता**

उमेदवार निवडीमुळे तिन्ही लोकसभा मतदारसंघांमध्ये सहयोगी पक्षांमध्ये नाराजी नाट्य रंगले. त्यात ठाण्यात भाजपला ही जागा न मिळाल्यामुळे संघ विचारांच्या मतदारांमध्ये अजूनही नाराजी आहे. त्याचा फटका नोटाच्या स्वरूपात पडण्याची शक्यता आहे. २०१९ मध्ये ठाणे लोकसभा मतदारसंघात २० हजार ४२६ इतक्या मतदारांनी नोटाचा वापर केला होता. कल्याण लोकसभेत १३ हजार १२ नोटा मतदान झाले होते. तर भिवंडीत १६ हजार ३९७ नोटा मतदान झाले होते.

**तीन खासदार हॅट्ट्रीकच्या उंबरठ्यावर**

ठाणे, कल्याण व भिवंडी या तिन्ही लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार कपिल पाटील, राजन विचारे, डॉ. श्रीकांत शिंदे तिसऱ्यांदा निवडणूक लढवत आहेत. हे तिन्ही खासदार हॅट्ट्रीकच्या उंबरठ्यावर असून मतदार त्यांना संसदेत जाण्याची संधी देणार का, हे पाहावे लागणार आहे. निवडणूकीत चांगलीच चुरस निर्माण झाली आहे.

## वे|ध|क

### मोदींची गच्छंती निश्चित

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजातील दलित, वंचित व व्यापाऱ्यांच्या जीवन कठीण केले असून यावेळी भाजपचा पराभव निश्चित असल्याचा पुनरुच्चार काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आज केला. दिल्लीतील चांदणी चौक मतदारसंघातील रामलिला मैदानावर आज रात्री त्यांची जाहीरसभा झाली. यावेळी काँग्रेसचे दिल्लीतील उमेदवार जयप्रकाश अग्रवाल (चांदणी चौक), कन्हैय्याकुमार (उत्तर पूर्व दिल्ली) व डॉ. उदित राज (उत्तर पश्चिम दिल्ली) उपस्थित होते. यावेळी त्यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर पुन्हा हल्ला केला.

### भारत कंगाल होण्याच्या मार्गावर

**उल्हासनगर :** काँग्रेसला वैतागून लोकांनी भाजपला मतदान केले; मात्र २०१४ पासून नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने अपेक्षा भंग केले आहे. भारत देश कंगाल होण्याच्या मार्गावर आहे. देशाची वाटचाल अराजकतेकडे चालली आहे, अशी टीका वंचित बहुजन पक्ष आघाडीचे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. उल्हासनगर ५ येथील दशहरा मैदान या ठिकाणी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ. मोहम्मद शहाबुद्दीन शेख यांच्या प्रचारासाठी आंबेडकर उल्हासनगरला आले होते.

# मी कधीही मुलगी आणि पुतण्या भेद केला नाही

■ **शरद पवारांचं वक्तव्य**

। मुंबई । वृत्तसंस्था ।

सुप्रिया यांना फक्त खासदारकी दिली असून त्या लोकसभेतील पक्षाच्या गटनेत्या आहेत आणि आतापर्यंत दिल्लीच्या राजकारणातच आहेत. त्यांना कधीही सत्तापद देण्यात आलेले नाही. मात्र अजित पवार यांना कायमच सत्तापदे दिली. राज्यमंत्रीपदापासून अनेक कॅबिनेट मंत्रीपदे, महत्त्वाची खाती, तीन वेळा उपमुख्यमंत्रीपद, विधिमंडळातील गटनेतेपद, विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद हे सर्व काही देण्यात आले. मी मुलगी आणि पुतण्या असा भेद कधीही केला नाही, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले.



जुलै २०२३ या महिन्यात शरद पवारांना राजकारणात मोठा धक्का बसला. तो धक्का हा होता की अजित पवार यांनी पक्षातल्या ४२ आमदारांना बरोबर घेत थेट सत्तेत सहभागी होणं पसंत केलं. २ जुलै २०२३ या दिवशी अजित पवारांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. तसंच राष्ट्रवादी काँग्रेसमधला ४२ आमदारांचा गट सत्तेत सहभागी झाला. या भूमिका शरद पवारांनी विरोध केला. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. यानंतर पक्षाचं चिन्ह आणि नाव हे अजित पवारांच्या गटाला देण्यात आलं. लोकसभा निवडणुकीत बारामतीची लढत पार पडली आहे. अशात अजित पवार हे वारंवार म्हणत आहेत की आम्ही तुमच्या (शरद पवार) पोटी जन्माला आलो नाही ही आमची चूक आहे का? आता यावर शरद पवारांनी उत्तर दिलं आहे.

आम्ही वरिष्ठांच्या पोटी (शरद पवार) जन्माला आलो तर आम्हाला अध्यक्षपद मिळालं असतं. काही झालं नसतं, पक्ष माझ्या ताब्यात आला असता. खरं तर मी साहेबांच्या सख्ख्या भावाचाच मुलगा. त्यांच्या पोटी जन्माला आलो नाही हे आमचं दुर्दैव. आम्हाला सांगितलं गेलं की मुलीला राष्ट्रीय अध्यक्ष करायचं आहे. आम्ही ते पण मान्य केले. असे अजित पवार यांनी म्हटले होते. तसंच शरद पवार यांच वय झालं आहे आता त्यांनी राजकारणात थांबायला पाहिजे असाही सल्ला अजित पवारांनी दिला होता. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही हा मुद्दा समोर आला. या सगळ्यावर शरद पवारांनी एका कार्यक्रमात उत्तर दिलं आहे.

सुप्रिया सुळे यांना राष्ट्रीय राजकारणात आणि अजित पवार यांना राज्याच्या राजकारणात जबाबदारी देण्याचा प्रस्ताव प्रफुल पटेल यांनी दिला होता, पण मी तो स्वीकारला नाही, या म्हणण्यात तथ्य नाही.


# ‘बूथ ताब्यात घेण्याचा नवा परळी पॅटर्न’

■ **रोहित पवारांच्या आरोपाने खळबळ**

। पुणे । वृत्तसंस्था ।

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी आणि महाराष्ट्रातील शेवटच्या टप्प्यासाठी सोमवारी (ता. २० मे) मतदान होणार आहे. आतापर्यंत चार टप्प्यांतील मतदान झाले आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एक व्हिडीओ एक्स अकाउंटवर पोस्ट केला आहे. तसेच बीड लोकसभा मतदारसंघातील मतदानावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांच्यावर थेट नाव न घेता गंभीर आरोप केले आहेत.

लोकसभा निवडणुकीचे आतापर्यंत चार टप्प्यात मतदान पार पडले आहे. या चारही टप्प्यातील मतदानादरम्यान बारामती, अहमदनगर, शिरूर मतदारसंघातील काही व्हिडीओ रोहित पवार यांनी एक्स अकाउंटवर शेअर केले होते. त्यामध्ये काही मतदान केंद्रामध्ये गैरप्रकार झाल्याचा आरोप त्यांनी केला होता. १३ मे रोजी बीड लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडले होते. या मतदानानंतर विरोधकांनी मतदान केंद्रामध्ये गैरप्रकार झाल्याचा आरोप केला होता. मात्र, यानंतर आता शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी बीड लोकसभा मतदारसंघातील एक व्हिडीओ एक्स अकाउंटवर शेअर केला आहे.



रोहित पवार यांनी शेअर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं की, ‘‘बूथ ताब्यात घेऊन मतदान करण्याचा परळी पॅटर्न महाराष्ट्राला शोभत नाही. ही हिम्मत कुठून येते? निवडणूक आयोग किती दिवस बघ्याची भूमिका घेणार?’’, असे अनेक सवाल रोहित पवार यांनी विचारले आहेत. रोहित पवार यांनी शेअर केलेला व्हिडीओ हा बीड जिल्ह्यातील इंजेगावमधील असल्याची माहिती समोर येत आहे. या आरोपानंतर राज्यात चांगलीच खळबळ उडाली आहे.

# केजरीवाल पुन्हा रस्त्यावर; आपचा मोर्चा भाजप मुख्यालयावर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

स्वीय सहाय्यक विभव कुमार यांच्या अटकेनंतर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी स्वाती मालिवाल मारहाणप्रकरणी अखेर मौन सोडले. आम आदमी पक्षाच्या नेत्यांना भाजप तुरुंगात टाकत असल्याचा आरोप त्यांनी केला, तसेच पक्षाच्या नेत्यांसमवेत भाजप मुख्यालयावर धडक देण्याची घोषणा त्यांनी केली.



आमच्या हव्या त्या नेत्याला अटक करून दाखवा, असे आव्हानही केजरीवालांनी भाजपला दिले. राज्यसभा खासदार स्वाती मालिवाल यांना मारहाण केल्याच्या आरोपाखाली केजरीवाल यांचे स्वीय सहाय्यक विभव कुमार यांना दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. मद्यधोरण गैरव्यवहार प्रकरणात जामिनावर बाहेर असलेले केजरीवाल या संपूर्ण घटनाक्रमामध्ये गप्प का आहेत, असा सवाल भाजपकडून उपस्थित केला जात होता.

### आता ब्रेल लिपीतील मतदार चिठ्ठी

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात सर्वत्र लोकशाहीचा उत्सव साजरा करण्यात येत आहे. या उत्सवात सर्वांनी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. अशात दिव्यांग व अंध व्यक्तींनाही मतदान करता यावे, यासाठी ठाणे जिल्हा प्रशासनाने ब्रेल लिपीतील मतदार चिठ्ठी देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार ठाणे जिल्ह्यातील ठाणे, कल्याण आणि भिवंडी मतदारसंघातील सात पाच हजार ४९८ अंध मतदारांना ब्रेल लिपीतील मतदार चिठ्ठीचे वाटप करण्यात आले.

# भ्रष्ट, गद्दार विरुध्द सामान्य नागरिक, निष्ठावान

## आदित्य ठाकरे यांचे प्रतिपादन

। ठाणे । वृत्तसंस्था ।

ईशान्य मुंबईत भाजपच्या पदाधिकाऱ्याला पैसे वाटप करतांना आम्ही पकडले. मात्र, पोलिसांनी उलट आमच्यावरच गुन्हे दाखल केले. त्यामुळे ही लढाई भ्रष्टपरिवार, गद्दार विरुध्द सामान्य नागरीक, निष्ठावान यांच्यात होत असल्याचे प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केली. तसेच त्यांच्याकडे ईडी, सीबीआय, गुंडगिरी आहे. आमच्याकडे निष्ठावान सैनिक आहेत. त्यामुळे ठाण्याचा गडच काय कल्याणचा गडही आम्ही राखू असा विश्वासही आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला.



ठाणे लोकसभेचे उध्दव सेनेचे उमेदवार राजन विचारे आणि कल्याणच्या वैशाली दरेकर यांच्या प्रचारार्थ ठाणे आणि कळवा, खारेगाव भागात प्रचार रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत आदीत्य ठाकरे सहभागी झाले होते. तसेच त्यांच्या समवेत वरुण सरदेसाई, शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाडांसह आदी पदाधिकारी सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी हा विश्वास व्यक्त केला.

आदीत्य ठाकरे यांनी सकाळी शक्तीस्थळावर जाऊन आनंद दिघे यांच्या स्मृतींना वंदन केले. त्यानंतर ते कळवा, खारेगाव या भागात गेले व प्रचार रॅलीत सहभागी झाले. ठाण्याचे उध्दव ठाकरे सेनेचे उमेदवार राजन विचारे यांची देखील बाईक रॅली काढण्यात आली. शक्तीस्थळापासून या रॅलीला सुरवात झाली. त्यानंतर महागिरी, सिडको, शांतीनगर, वागळे चेकनाका, साठे नगर, इंदिरानगर नाका, अंबिका नगर, राम नगर, यशोधन नगर, शास्त्रीनगर नाका, शिवाई नगर, वर्तकनगर नाका, लुईसवाडी, हाजुरी, बी कॅबीन, गोखले रोड, तीन पेट्रोल पंप आदींसह शहराच्या विविध भागातून ही बाईक रॅली गेली.

पाचव्या टप्प्यातील निवडणुकीचा प्रचार शिगेला पोचला असताना शनिवारी प्रचाराच्या तोफा थंड होण्या अगोदर महायुती आणि महाविकास आघाडीच्या जोरदार प्रचार सुरू असल्याचे दिसून आले.

पान १ वरुन

### दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात आठ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील ४९ जागांसाठी मतदान होणार आहे. यात महाराष्ट्रातील धुळे, दिंडोरी, नाशिक, कल्याण, पालघर, भिवंडी, ठाणे, मुंबई उत्तर, मुंबई उत्तर पूर्व, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई उत्तर मध्य, मुंबई दक्षिण मध्य आणि मुंबई दक्षिण या १३ मतदारसंघांचा समावेश आहे.लोकसभेच्या ८.९५ कोटी मतदारांमध्ये ४.६९ कोटी मतदान पुरूष तर ४.२६ कोटी महिला आहे. ५ हजार ४०९ तृतियपंथी मतदारही हक्क बजावणार आहे. त्याचप्रमाणे वयवर्षे ८५ हून अधिक मतदारांची संख्या ७.५१ लाख एवढी आहे. शंभरहून अधिक वय असलेले मतदार जवळपास २५ हजार आहेत. निवडणूक आयोगाने मतदानासाठी १५३ निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. त्याचप्रमाणे दोन हजार फ्लाईंग स्कॉड, २१०५ सर्व्हिलन्स टीम, ८८१ व्हिडिओ सर्व्हिलन्स टीम, ५०२ व्हिडिओ विव्हिंग टीम तैनात करण्यात आल्या आहेत. तसेच २१६ आंतरराष्ट्रीय सीमा तपासणी नाके, ५६५ आंतरराज्य चेकपोस्टही असतील.आठ राज्यांतील ९४ हजार मतदान केंद्रांमध्ये ९ लाख ४७ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रांवर मतदारांच्या सोयीसाठी पाण्याची व्यवस्था, शेड, स्वच्छतागृह, रॅम्प, स्वयंसेवक, व्हीलचेअर आणि वीजपुरवठा आदी सुविधा उपलब्ध करून दिल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

### चुरशीची लढत

**ईशान्य मुंबईत भाजपाचे मिहीर कोटेचा यांच्याविरुद्ध शिवसेना ठाकरे गटाच्या संजय दिना पाटील यांच्यात मुख्य लढत आहे. त्यामुळं संजय दिना पाटील भाजपाचा बालेकिल्ला भेदणार का हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. तर दक्षिण मध्य मुंबईत मातोश्रीच्या दोन आजी–माजी निष्ठावंतात थेट लढत आहे. शिंदे गटाकडून राहुल शेवाळे, तर ठाकरे गटाकडून अनिल देसाई निवडणुकीच्या मैदानात आहेत. त्यामुळं यापैकी कोण बाजी मारणार? याकडं सर्वांचं लक्ष लागलं आहे.**

### रायगडातून ७५ बसेस

व ठाण्यामध्ये गेल्याने प्रवाशांची प्रचंड गैरसोय झाली आहे. अलिबागसह जिल्ह्यातील अनेक आगारांतील फेऱ्या रद्द झाल्याचा त्रास प्रवाशांना सहन करावा लागला.

**नालासोपारा एसटी रद्द**

अलिबाग बसस्थानकातून नालासोपारा एसटी बस दुपारी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास सुटते. रविवारी काही प्रवाशांनी बसचे आगाऊ आरक्षण केले होते. मात्र, ठाणे व मुंबईमध्ये होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर ही बस रद्द करण्यात आली. त्याचा फटका नालासोपाराकडे जाणाऱ्या प्रवाशांना बसला.

### ...तर शर्यतीतून बैल बाद होणार!

मृत्यूची नोंद घेण्यात येते. रोग प्रतिबंधात्मक लसीकरण आणि औषधोपचार, वंध्यत्व उपचार, मालकी हक्क हस्तांतरण याची नोंद ठेवण्यात येते. पशुधनाचे प्रजनन, त्याचा मालक, जन्म-मृत्यू, आजार, त्यावर केलेले उपचार आदींची माहिती ठेवण्यात येते.

### पर्यटक अडकले वाहतूक कोंडीत

पर्यटकांनी रायगड जिल्ह्याला पसंती दर्शविली आहे. मुंबई, पुण्यासह अन्य जिल्ह्यांतील पर्यटक रायगड जिल्ह्यात दाखल झाले आहेत. काही पर्यटक शनिवार व रविवार साप्ताहिक सुट्टीचा आनंद घेण्यासाठी रायगड जिल्ह्यात दाखल झाले आहेत. उन्हाचे चटके जाणवत असल्याने पर्यटकांनी अलिबाग, मुरूड, काशीद, नागाव, श्रीवर्धन, किहीम, आक्षी, मांडवा आदी समुद्रकिनारी फिरण्यास पर्यटकांनी महत्त्व दिले आहे. रविवारी पर्यटकांनी समुद्रकिनारे फुलून गेले आहेत. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली. चारफाटासह पेण, अलिबागमधील रिलायन्स बायपास, इंदापूर, माणगाव, खारपाडा, अलिबाग, रेवदंडा मार्गावर ठिकठिकाणी वाहनांच्या रांगा एक ते दोन किलोमीटर अंतरावर दिसून आल्या. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई-गोवा महामार्गाचे काम सुरु आहे. ते अपूर्ण स्थितीत असल्याचा फटका प्रवाशांसह पर्यटकांना बसत आहे. त्यामुळे सरकारच्या कामांबाबतदेखील पर्यटकांनी नाराजी व्यक्त केली. जिल्ह्यातील वाहतूक कोंडी सुरळीत करण्यासाठी तसेच वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखा तयार करण्यात आली. पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील वाहतूक सुरळीत करण्याचे काम सोपवण्यात आले. जिल्हा वाहतूक शाखेत ९० वाहतूक पोलीस देण्यात आले आहेत. मात्र, रविवारी पर्यटकांची गर्दी असतानादेखील त्याठिकाणी फक्त ३० वाहतूक पोलिसांच्या भरोवशावर वाहतूक कोंडी सुरळीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अनेक ठिकाणी वाहने संथगतीने धावत असल्याने पर्यटकांना त्यांच्या निश्चित स्थळी पोहोचण्यास उशीर झाल्याचे बोलण्यात आले आहे. उर्वरित वाहतूक पोलिसांना निवडणुकीच्या कामात पाठविल्याचा फटका बसला.

### पोलीस अधिकाऱ्याची दुचाकी गायब

सुमारास अलिबागमधील एसटी स्थानकात पार्किंग करून ठेवली होती. दुसऱ्या दिवशी ती दुचाकी त्यांना जागेवर दिसून आली नाही. त्यांनी ठिकठिकाणी शोधाशोध सुरु केली. मात्र, दुचाकी सापडली नाही. त्यामुळे त्यांनी दुचाकी चोरीला गेल्याची तक्रार अलिबाग पोलीस ठाण्यामध्ये केली. पोलीस उपनिरीक्षक महाले यांनी तपास सुरु केला. अखेर स्थानकाच्या दुसऱ्या जागी दुचाकी सापडली असल्याची माहिती अलिबाग पोलिसांनी दिली.

### माथेरानमध्ये पाणीवाटपात दुजाभाव

संबंधित ठेकेदार कंपनीने जनतेला स्पष्टीकरण द्यावे, अशी त्यांची मागणी आहे.सध्या माथेरानमधील दाट वस्तीत एक ते सव्वा तास अत्यंत कमी दाबात पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे प्रत्येक घरगुती कनेक्शनधारकांना जेमतेम ५०० लीटर पाणी मिळते. त्यातसुद्धा दर मंगळवार आणि बुधवारी गावातील काही विभागातील पाणीकपात केली जाते.त्यावेळी पाणी मुबलक प्रमाणात मोठ्या हॉटेलधारकांना दिले जाते. याचे पुरावे आपल्याकडे आहेत, असा दावा जनार्दन पार्टे यांनी केला आहे. माथेरानमधील नागरिकांना किरकोळ प्रमाणात पाणी दिले जाते. त्यांच्या हक्काचे पाणी इतरत्र वळविले जाते, त्याला जनार्दन पार्टे यांनी विरोध आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकारण आणि खासगी ठेकेदार हे माथेरानमध्ये पाणी वितरण करताना दुजाभाव करतात हेच यावरून सिद्ध होत असल्याचा त्यांचा दावा आहे.

### महिलेने घातला एक कोटीचा गंडा

त्याच्याशी संपर्क तोडला. त्याची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्या इसमाने पोलीस अधीक्षक कार्यालयातील सायबर सेल विभागात तक्रार केली. याबाबत पोलीस निरीक्षक अश्वनाथ खेडेकर अधिक तपास करीत आहे.

### मतदान आकडेवारीवर संशय

अंतिम टप्प्यात असून, सोमवारी पाचव्या टप्प्याचे मतदान होत आहे. निवडणूक आयोगाने यापूर्वी जाहीर केलेल्या मतदानाच्या आकडेवारीवर संशय व्यक्त केला जात आहे. निवडणूक आयोगाने पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्याची मतदान आकडेवारी अनुक्रमे ११ आणि ५ दिवसांनी जाहीर केली. त्यातही अनुक्रमे ७ आणि ५ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली. यावर आक्षेप घेत असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म (एडीआर) या स्वयंसेवी संस्थेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. मतदानानंतर ४८ तासांच्या आत मतदानाची अंतिम आकडेवारी निवडणूक आयोगाने संकेतस्थळावर जाहीर करावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने प्रशांत भूषण यांनी बाजू मांडत तात्काळ सुनावणी घेण्याची मागणी केली. त्यावर न्यायालयाने निवडणूक आयोगाला नोटीस बजावून सात दिवसांच्या आत उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत.

### महाराष्ट्र भाजपामुक्त होणार : पटोले

भ्रष्टाचार, तानाशाह व्यवस्था केंद्रीय तपास यंत्रणेचा गैरवापर, बेरोजगारी शेतकऱ्यांवरील अन्याय यावर ना देशाचे पंतप्रधान बोलले, ना राज्याचे मुख्यमंत्री. नरेंद्र मोदी यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला, शाह आले, योगी आले, पण त्यांचा प्रभाव दिसून आला नाही. रोड शोच्या नावाने नरेंद्र मोदी यांनी मुंबईला वेठीस धरण्याचा काम केलं. गुजरातवरुन लोक आणावे लागले.

# मतदारांसाठी जिल्हा आरोग्य यंत्रणा सज्ज

। ठाणे । वृत्तसंस्था ।

हवामान खात्याने आगामी तीन ते चार दिवस ठाणे, मुंबईत उष्मा वाढणार असल्याचा इशारा दिला आहे. त्यातच या शहरांमध्ये सोमवारी (ता. २०) लोकसभा निवडणुकीचे मतदान होत आहे. त्यामुळे मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदानासाठी बाहेर पडावे, असे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे. मतदारांमध्येही मोठा उत्साह दिसून येत आहे. त्यामुळे अशा उष्म्यात मतदार आणि त्यांच्या सुरक्षेसाठी उन्हात उभे राहून पहारा देणाऱ्या पोलिसांसाठी जिल्ह्याची आरोग्य यंत्रणा धावून आली आहे. जिल्हा आरोग्य विभागाने ठाण्यातील २० हजार पोलिस आणि सर्व मतदान केंद्रांना सात हजार प्रथमोपचार पेटी आणि ओआरएच पाकिटाचे वाटप केले आहे.

देशातयंदा १८व्या लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक पार पडत आहे. या निवडणुकीचा पाचवा आणि राज्यातील अंतिम टप्पा ठाणे, मुंबईत सोमवारी पार पडणार आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने सर्व यंत्रणांना सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी, कल्याण आणि ठाणे लोकसभा मतदार संघात १५ हजार पोलिस फौजफाटा तैनात आहे. उन्हातान्हाची पर्वा न करता पोलिस त्यांचे कर्तव्य बजावले जाणार आहे. मतदारांनीदेखील देशाच्या सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या मतदान उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन निवडणूक आयोग, राज्य सरकार, विविध सामाजिक संस्थांकडून करण्यात आले आहे. प्रशासनानेही जय्यत तयारी केली आहे. हवामान विभागाकडून ठाण्यासाठी देण्यात आलेल्या उष्माघाताच्या इशाऱ्यामुळे ठाणे जिल्हा आरोग्य विभागदेखील सज्ज झाला आहे.

ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाचे मुख्य जिल्हा शक्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवली आहे. सामान्यरुग्णालयांतर्गत येणाऱ्या ग्रामीण रुग्णालय, आरोग्य केंद्र, उपआरोग्य केंद्र, महापालिका रुग्णालयांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. ठाणे, भिवंडी आणि कल्याण लोकसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रांवर जिल्हा आरोग्य विभागाने सात हजाराहून अधिक प्रथमोपचार पेट्या पाठवून दिल्या आहेत.

या किटमध्ये प्रथमोपचारासाठी लागणारी सर्व औषधे, बँडेज, ओआरएच ठेवले आहेत. तसेच जिल्हा रुग्णालय आणि महानगर पालिकांच्या रुग्णवाहिका तैनात ठेवल्या आहेत. यासोबतच बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांना २० हजार ओआरएचची पाकिटे देण्यात आली आहेत.

## विद्यार्थी मोफत गणवेश योजना; सूक्ष्म कटाईने मिळणार कापड

# शिलाई बचत गटाच्या हाती

| सुयोग आंग्रे |
| रायगड |

राज्य सरकार मार्फत राबवण्यात येणाऱ्या मोफत गणवेश योजना २०२४-२५ साठी राज्य स्तरावरून कापड येणार आहे. प्रत्येक गावातील महिला बचत गटाच्या प्रतिनिधी ते कापून त्यातून गणवेश शिवून देणार आहेत. यासाठीचे नियोजन सुरू झाले असून रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळेसह सर्व शासकीय शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी या योजनेसाठी लाभार्थी आहेत. मोफत गणवेश योजना राबवण्यासाठी प्रत्येक तालुका पातळीवर गटशिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती असून ही समिती मोफत गणवेशाचे काम पाहणार आहेत.

जूनमध्ये सुरू होणाऱ्या शैक्षणिक सत्रात राज्यातील विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश शिवून मिळणार आहेत. त्यासाठी राज्य स्तरावरून ठराविक मापात कापलेले कापड पुरविले जाणार असून गावातील बचत गटाच्या महिला हा गणवेश शिवून शाळांपर्यंत पोहोचविणार आहेत. याबाबतचा कार्यारंभ आदेश महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून देण्यात आले आहेत. दरवर्षी मोफत गणवेश योजनेत शाळा पातळीवर असणाऱ्या शाळा व्यवस्थापन समितीला पैसे देवून त्यानुसार गणवेश खरेदी करण्यास सांगण्यात येत होते. मात्र, यंदापासून योजनेच्या अंमलबजावणीत बदल करण्यात आला आहे. यंदापासून राज्य पातळीवरून कापड पूरवण्यात येणार असून हे कापड महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्यावतीने चालवण्यात येणाऱ्या महिला बचत गटांच्या प्रतिनिधी यांच्यामार्फत ते शिवून घेण्यात येणार आहे.

यासाठी संबंधीत बचत गटाच्या महिला प्रतिनिधींना शाळेच्या इयत्ता आणि विद्यार्थ्यांच्या वयानूसार ठराविक माप कळवून त्यानूसार गणवेश शिवून घेण्यात येणार आहे. शिवून घेण्यात येणाऱ्या या गणवेशात एक नियमित गणवेश तर दुसरा हा स्काऊट गाईडचा असणार आहे. यातील एक गणवेश १ जूनपर्यंत तर दुसरा गणवेश १५ जून अथवा शाळा सुरू होण्याच्या दिवसापर्यंत शिवून घेण्यात येणार असून शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचे वाटप होणार आहे. यासाठी प्रत्येक तालुक्यात गटशिक्षणाधिकारी यांच्या स्तरावर समिती गठीत करण्यात आली असून ही समिती मोफत गणवेश विषयावर नियंत्रण आणि देखरेख ठेवणार आहे.

रायगड जिल्ह्यात तालुका पातळीवर असणाऱ्या प्रत्येक बीआरसी, सीआरसी केंद्रात इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ६४ स्वतंत्र बॉक्स उपलब्ध होतील. प्रत्येक बॉक्समध्ये १०० गणवेशासाठी कटाई केलेले कापड (मायक्रो कटिंग केलेले) असतील. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी चार आणि प्रत्येक विद्यार्थिनींसाठी चार बॉक्समध्ये हे कापडाचे तुकडे असतील. त्या तुकड्यांमधून बचत गटांना एक गणवेश तयार करून द्यायचा आहे. गणवेश शिवण्यापूर्वी महिला शाळेत जाऊन विद्यार्थ्यांची मापे स्टँडर्ड मापानुसार आहेत की नाही, याची खात्री करतील.

### गणवेशाचे माप असणार स्टँडर्ड



### असा असेल गणवेश

२०२४-२५ या सत्रासाठी दोन गणवेश पुरविले जाणार आहेत. यात एक गणवेश नियमित तर दुसरा स्काउट गाईडचा असेल.गणवेश स्काऊट व गाईड विषयास अनुरूप (मुलांसाठी आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळ्या रंगाची हाफ पँट/ पँट तसेच, मुलींना आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळ्या रंगाचा स्कर्ट किंवा ज्या शाळांमध्ये सलवार कमीज असेल तर सलवार गडद निळ्या रंगाची व कमीज आकाशी रंगाची) अशा स्वरूपात गणवेशाची रचना असावी. त्यापैकी एका गणवेशाला विद्यार्थ्याच्या शर्टवरती शोल्डर स्ट्रिप व दोन खिसे असणे आवश्यक आहे. नियमित गणवेशामध्ये मुलांसाठी आकाशी शर्ट व गडद निळ्या रंगाची पँट. मुलींसाठी आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळ्या रंगाचा स्कर्ट असेल. आठवीच्या विद्यार्थिनींना ओढणीसाठीही कापड पुरविले जाणार आहे.

# रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## अनिरुध्द राणे मित्रमंडळ आयोजित उपक्रम



| अलिबाग | प्रतिनिधी |

अनिरुध्द राणे मित्रमंडळ आयोजित स्व. अनिरुध्द राणे यांच्या वाढदिवसानिमित्त नागावमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम रविवारी (दि.१९) नागाव ग्रामपंचायत सभागृहामध्ये पार पडला.

यावेळी नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, माजी सरपंच नंदकुमार मयेकर, सदस्य निखील मयेकर, उपसरपंच सुरेंद्र नागलेकर, श्रीकांत आठवले, मंगेश राणे, मंजुषा राणे, सुरज म्हात्रे, शुभम नाईक, विप्रय सावंत, अभिषेक राणे, प्रसाद राऊत आदी मान्यवरांसह अनिरुध्द राणे मित्रमंडळाचे पदाधिकारी, व रक्तदाते तसेच रक्तपेढी विभागाचे रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. शितल स्वामी,रक्तपेढी तंत्रज्ञ सुनील बंदिछोडे, हेमकांत सोनार, अभिषेक घरत, सुशांत भगत, रिध्दी गुरव, जयेश विधाते, वैभव कांबळे, उमेश पाटील, महेश घाडगे आदी उपस्थित होते. या शिबिरामध्ये एकूण ११० जणांनी रक्तदान करून बांधिलकी जपली. अनिरुध्द राणे सामाजिक बांधिलकी जपत दरवर्षी त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर आयोजित करीत होते. त्यांची आठवण म्हणून नागावमध्ये मित्रमंडळाच्याावतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले होते.

# तळवडे येथे आंबा बागायतीचे नुकसान

| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळजवळील तळवडे येथील शेतकरी दिलीप खंडू शेळके यांची आंब्याची बाग यावर्षी अवकाळी आणि गारपीट यांच्या निशाण्यावर आली. ८० झाडांवरील आंब्याचे नुकसान झाले असून अनेक आंब्याची झाडे कोसळली आहेत. केशर जातीच्या आंब्याची बाग यावर्षी पूर्णपणे नष्ट झाली असून या बागेचे १०० टक्के नुकसान झाले.

यावर्षी आंब्याच्या झाडांना फारशी फळे नसताना शेळके यांच्या आंब्याच्या बागेतील ८० झाडांना केशर आंब्याचा बहर आला होता. त्यामुळे चांगले पीक आंबा उत्पादनातून हाती मिळण्याची खात्री शेळके कुटुंबाला होती.मात्र यावर्षी शेळके कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान आंब्याचा पिकाची नासाडी झाल्याने झाले आहे. दोन दिवस झालेल्या गारपीटीमुळे सर्व आंब्याच्या झाडावरील फळे जमिनीवर कोसळली होती.



# जांभळे, करवंदे खाण्यात बच्चे कंपनी मग्न



| अलिबाग | प्रतिनिधी |

मोबाईलच्या दुनियेत रमणारी बच्चे कंपनी सुट्टीमध्ये शेतावर जाऊन वेगवेगळ्या फळांचा आनंद घेत आहेत. अनेक तरुणांसह बच्चे कंपनी शेतावर जाऊन जांभळे, करवंदे व रायवळी आंबे खाण्याचा आनंद लुटत आहेत.

शाळांना सुट्टी पडली आहे. काहीजण मामाच्या गावासह अन्य ठिकाणी फिरण्यास गेले आहेत. तर काही जण सुट्टीचा आनंद घालविण्यासाठी गावी दाखल झाले आहेत. रायगड जिल्ह्यात रायवळी आंबे, जांभळे व करवंदे या हंगामात मोठ्या प्रमाणात मिळत आहेत. आपल्या कुटुंबीयासमवेत गावी फिरण्यास आलेली बच्चे कंपनी गावांतील मुलांसोबत शेतावर फिरण्याचा आनंद घेत आहेत. शेतावर गेल्यावर झाडावर लटकलेले जांभूळ काढणे, झुडपातील पिकलेले करवंद, रायवळी आंबे दगड मारून, किंवा झाडावर चढून काढण्यामध्ये मग्न होऊ लागली आहेत. एक वेगळा आनंद यातून घेण्याचा प्रयत्न ही बच्चे कंपनी घेत आहेत.

सध्या अनेक बच्चे कंपनी मोबाईलमध्ये रमत आहेत. त्यामुळे उन्हाळी सुट्टीत शेतावर जाऊन आंबे, करवंद, जांभळे खाण्याचा आनंद कालबाह्य होण्याच्या मार्गावर होता. मात्र हा आनंद आजही जिल्ह्यात अनेक गावांमध्ये पहावयास मिळत आहे.

# रायगडात १ लाख हेक्टर खरीपाची लागवड

## रायगड कृषी विभागाचे खरीप नियोजन पूर्ण

| रायगड | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात १ लाख १ हजार ५१० हेक्टरवर यंदा खरीपाची लागवड करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. यात प्रामुख्याने भात, नागली आणि तूर पिकांचा समावेश आहे. जिल्ह्यात भाताची उत्पादकला वाढविण्यावर यंदा भर दिला जाणार आहे. त्यासाठी कृषी विभागाने तयारी पुर्ण केली आहे. रायगड जिल्ह्यात ९८ँहजार ४८७ हेक्टरवर भाताची लागवड केली जाणार आहे. तर ३ हजार ०२३ हेक्टरवर नागली लागवडीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. गेल्या वर्षी ९० हजार हेक्टरवर भाताची लागवड करण्यात आली होती. यावर्षी त्यात वाढ करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.



खरिप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी देखील कामाला लागला आहे. मशागतीची कामे शेतकऱ्यांनी सुरु केली आहेत. दक्षिण रायगडात धूळपेरणीची कामे सुरु झाली आहेत. याशिवाय बांधबंदिस्ती, चर मारणे यासारखी कामेदेखील सुरु झाली आहेत.

### शेती क्षेत्र घटतयं

जिल्ह्यात वाढते औद्योगिकरण, शहरीकरण, शेतमजूरांची कमतरता यावेळी दरवर्षी भातलागवडीखालील शेती क्षेत्रात घट होत आहे. भात लागवडीचे क्षेत्र १ लाख २४ हजार हेक्टरवरून १ लाख १ हजार हेक्टवर येऊन ठेपले आहे. शेती क्षेत्रातील घट चिंताजनक आहे. शेतकरी शेतीपासून दूरावत चालल्याचे यातून दिसून येत आहे.

# १८०० जागांसाठी पावणेचार लाख अर्ज

**रायगड** : राज्याच्या गृहमंत्रालयाकडून कारागृह रक्षकांची लवकरच भरती केली जाणार आहे. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर ही प्रक्रिया सुरू होणार असताना अवघ्या १८०० जागांसाठी तब्बल पावणेचार लाख अर्ज आले आहेत. राज्यात कारागृह रक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे जवळपास सर्वच कारागृहातील सुरक्षा व्यवस्था वाऱ्यावर आहे. ही बाब लक्षात घेऊन गृहमंत्रालयाने भरती प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला.

# निवडणुकांनंतर धान्यांचे भाव कडाडणार

| रायगड | प्रतिनिधी |

महाराष्ट्रासह देशातील बहुतांश राज्यांमध्ये साखर, तूरडाळी पाठोपाठ उडीद, हरभरा आणि मसूर या डाळींच्या किमती वाढलेल्या स्थितीत स्थिरावलेल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांचा रोष ओढवण्याची चिंता सरकारला सतावत आहे. अन्नधान्याची दरवाढ रोखण्यासाठी व्यापाऱ्यांना आठवड्याचा साठा जाहीर करण्याचे निर्देश दिले गेले आहेत. सर्व प्रकारच्या खाद्यान्नाचे दर नियंत्रणात राहावेत म्हणून केंद्र सरकारकडून लोकसभा निवडणुकीदरम्यान उपाययोजना केल्या जात आहेत. मात्र, निवडणूक संपताच सर्वच खाद्यान्नाचे भाव कडाडण्याचे संकेत मिळत आहेत.

लोकसभेचे चार टप्पे पूर्ण झाले आहेत. सोमवारी पाचवा टप्पा असून अजून निवडणुकीचे दोन टप्पे शिल्लक आहेत. यंदा कोणतीही लाट नसल्याने विद्यमान सरकारने महागाई वाढू नये म्हणून व्यापाऱ्यांवर साठ्याची माहिती देण्याचे निर्बंध लादले आहेत.

बाजारातही सध्या उन्हाळी सुटीमुळे अनेक जण पर्यटनाला गेलेले आहे. तसेच आंबेही मोठ्या प्रमाणात बाजारात आल्याने ग्राहकांची धान्य बाजारातील गर्दी कमी झालेली आहे. परिणामी, सर्वच धान्यांचे भाव वाढलेल्या स्थितीत स्थिरावलेले आहेत. ही स्थिरता निवडणुकीचे निकाल लागताच संपेल. निवडणुकीचे निकाल काहीही असोत यंदा उत्पादनच कमी असल्याने डाळी, तांदूळ, साखर, गव्हासह इतरही धान्याचे भाव प्रतिकिलो दोन ते सात रुपयांनी वाढण्याचे संकेत मिळत आहेत.

यंदा पावसाने दडी दिल्यामुळे पाणीटंचाई आणि इतरही समस्यांचा सामना करावा लागत आहे. सोबतच अवकाळी पावसाने धान्यपिकांचे नुकसान होत आहे. हीच अस्थिरता ग्राहकांची चिंता वाढवणारी आहे. कारण यंदा अवकाळी पावसामुळे डाळींसह इतरही धान्यांचे भाव वाढलेले आहेत.

# गोदी नदीच्या पुलाला झुडपांचा विळखा

| कोलाड | वार्ताहर |

मुंबई-गोवा महामार्गावरील कोकण रेल्वेच्या पुलाखाली असणाऱ्या गोदी नदीच्या पुलाला असंख्य काटेरी झुडपांनी विळखा घातल्यामुळे वाहने दिसत नसल्याने अपघाताची शक्यता आहे.

आंबेवाडी नाक्यावरील बाजारपेठेत काही दिवसांपूर्वी उड्डाण पुलाचे काम सुरु करण्यात आले आहे.

यामुळे रोहाकडे जाण्यासाठी महामार्गाच्या कोकण रेल्वेच्या पुलाखालून कोलाड हायस्कूलच्या नाजिकचा मार्ग असल्यामुळे हलकी वाहने अथवा दुचाकीस्वार या मार्गांवरून प्रवास करीत आहेत. परंतु गोदी नदीच्या पुलाला असंख्य झाडेझुडपे व वेलीने वेढले आहे.

यामुळे या मार्गांवरून पलीकडे जाणाऱ्या प्रवाशांना कोलाडकडून मुंबई बाजूकडे जाणारी वाहने दिसत नाही. यामुळे या मार्गावर अपघात होऊन नाहक बळी जाऊ शकतो.

निद्राअवस्थेत असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम खात्याने अशा महत्वाच्या कामाकडे लक्ष देऊन गोदी नदीच्या पुलाला वेढलेली झाडेझुडपे तातडीने तोडण्यात यावी अशी मागणी या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशी वर्गातून केली जात आहे.

# काशीद बीच हाऊसफुल्ल!

## उन्हाच्या काहिलीत पर्यटकांनी लुटला पोहण्याचा आनंद



● अलिबाग : सलग सुट्ट्या आल्याने अलिबाग समुद्र किनारा पर्यटकांनी फुलला आहे. (छायाचित्र- समीर मालोदे)





| कोर्लई | वार्ताहर |

मुरूड जंजिरा पर्यटनात मे महिन्यात तिसऱ्या विकेंडला मुरूड-बीच व काशिद बीचवर उन्हाच्या काहिलीत पर्यटकांनी समुद्रात पोहोण्याचा मनसोक्त आनंद लुटला. मुरूड बीच व काशीद बीचवर पर्यटकांची मे महिन्याच्या तिसऱ्या विकेंडला गर्दी पाहावयास मिळाली.

शनिवारी याच बीचवर तोबा गर्दी होती. मुरूड बीच व काशीद बीच हे पर्यटनात जगप्रसिद्ध असल्यामुळे या बीचवर पर्यटकांची सातत्याने वाढती वर्दळ असते. शेवटच्या टप्प्यात होणाऱ्या मतदानामुळे याचा पर्यटनावर परिणाम दिसून आला.

मे महिन्यातील तिसरा विकेंड असल्याने पर्यटकांची गर्दी पहावयास मिळाली. परंतु मुंबईतील पर्यटक कमी प्रमाणात दिसून येत होते. पुणे, सांगली, सातारा, कराड, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, औरंगाबाद, अहमदनगर, नाशिक, नागपूर, धुळे यवतमाळ अशा महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून तसेच महाराष्ट्राच्या बाहेरून व देश विदेशातून पर्यटक मुरूडला भेट देत असतात. मुरूड समुद्रकिनाऱ्यावरील रुपेरी वाळू, निळाशार समुद्र, समुद्रामध्ये मध्यभागी असलेला पद्मदुर्ग, मुरूडला असणाऱ्या नारळी पोफळीच्या बागा यामुळे पर्यटक मुरूडकडे आकर्षित होत आहे. काशीदबीचवर असणारी रुपेरी वाळू, सुरुची झाडे त्यामुळे पर्यटक काशीद बीचला ही भेट देत आहेत.

# मुरूडमध्ये पर्यटकांची अलोट गर्दी

| मुरुड | वार्ताहर |

मुरूड तालुक्यातील राजपुरी येथील सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला हा सोमवार दिनांक २६ मे पासून बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे शेवटचा शनिवार, रविवारची सुट्टी साधून आज असंख्य पर्यटकांनी किल्ला पहाण्यासाठी अलोट गर्दी केली होती.

किल्ला पहाण्यासाठी औरंगाबाद, जालना, परभणी, कल्याण, डोंबिवली, बोरिवली आदी भागातून हजारो पर्यटक मोठ्या संख्येने आले होते. त्यातच पावसाळा जवळ आल्याने लाटांचा प्रवाह वाढल्याने शिडाच्या बोटी हेलकावे घेत असल्याने किल्ल्यावर उतरणे जिकरीचे झाले होते.

परंतु थोड्या संयमाने पर्यटक किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ उतरत होते. किल्ल्यावर गर्दी झाल्याने असंख्य पर्यटकांनी शिडाच्या बोटींमधून किल्ल्यास प्रदक्षिणा घालून किल्ल्याचे रूप बाहेरून पाहण्यात समाधान करून घेतले. शिडाच्या बोटीवर काम करणाऱ्यांना तीन महिने घरीच बसावे लागणार आहे. म्हणून जास्ती जास्त पर्यटकांना किल्ल्यात नेण्याचा प्रयत्न शिडाच्या बोटीधारकांनी केला.





# मुंबईकरांची कसोटी

यंदाची निवडणूक मोदींच्या हुकुमशाहीविरुध्दची लढाई आहे. त्यात आपण कोणत्या बाजूने उभे राहायचे याचा फैसला मुंबईकर आज करणार आहेत. मुंबई, ठाणे व परिसरात आज मतदान होत आहे. राज्यातील मतदानाचा हा शेवटचा आणि अत्यंत महत्वाचा टप्पा आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या काळात तेव्हाची मुंबई एकदिलाने तत्कालीन सरकारच्या विरोधात उभी राहिली होती. त्याचा परिणाम म्हणून मुंबई महाराष्ट्रात राहिली होती. आज या देशात लोकशाही शिल्लक राहणार की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. या पाचव्या फेरीचा प्रचार संपत असतानाच दिल्ली मद्य घोटाळ्याबाबत अरविंद केजरीवालच नव्हे तर संपूर्ण आम आदमी पक्षाच्या विरोधातच आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. हा देशाच्या संसदीय इतिहासातील अभूतपूर्व प्रकार आहे. आम आदमी पक्षाला आरोपी ठरवून उद्या त्याच्यावर निवडणूक लढवण्यासाठी बंदी घालण्याचा प्रस्ताव देखील आणला जाऊ शकतो. विरोधक हे ठेचूक काढण्यासाठीच असतात अशी मोदींच्या लोकशाहीतील कल्पना आहे. संसदेत विरोधी खासदारांना बोलू न देण्यापासून तो त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यापर्यंत सर्व प्रयोग करून झाले आहेत. २०२४ मध्ये हे पुन्हा निवडून आले तर याच्या पुढचा टप्पा गाठला जाईल. लोकसभा नावालाच शिल्लक राहील. आजच मोदींना मत, मोदी की गॅरंटी, मोदी सरकार असा गजर करून भाजपलादेखील दुय्यम केले जात आहे. खुद्द उत्तर प्रदेशात भाजपच्या पोस्टर्सवर योगींचा देखील फोटो नाही. मोदी हा जणू देव आहे असे भासवले जात आहे. वास्तविक हा तथाकथित देव अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन खोटारडी व नीचपणाची भाषा करतो आहे. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात कसलाही उल्लेख नसताना मुस्लिमांना संपत्ती वाटणार किंवा आरक्षण काढून घेणार असा प्रचार करतो आहे. शिवाय, इतके करूनही मी हिंदू-मुस्लिम करीत नाही असेही तो म्हणतो. मुंबईकरांनी या ढोंगी आणि कपटी नेत्याचा पूर्ण नक्षा उतरवायला हवा.

### किती खालची पातळी गाठाल

शिवसेना फोडण्यात आल्यानंतर ही पहिलीच निवडणूक आहे. यापूर्वी अंधेरीची पोटनिवडणुकीत भाजपने बऱ्याच गर्जना केल्या. पण वातावरण ठाकरे गटाच्या बाजूने आहे हे लक्षात येताच तेव्हा ऐनवेळी शेपूट घातले. त्यानंतर महापालिका व राज्यातील जिल्हा परिषदा इत्यादींच्या निवडणुका होऊ नयेत यासाठी शिंदे गट व भाजपने प्रयत्न केले. त्यामुळे भाजपच्या फोडाफोडीच्या व भ्रष्ट राजकारणाला उत्तर देण्याची पहिली संधी मतदारांना यावेळी पहिल्यांदा मिळणार आहे. मुंबईतील मराठी टक्का अजूनही ठाकरे यांच्या बाजूने आहे हेही यावेळी स्पष्टपणे दिसून येणार आहे. प्रचारात त्याचे प्रत्यंतर आले. मराठी मतदारांच्या दणक्यामुळेच महायुतीला चार मराठी उमेदवार द्यावे लागले आहेत. मराठीखेरीज मुस्लिम, दलित मतदार काँग्रेसच्या बाजूने एकगठ्ठा मतदान करतील अशी स्थिती आहे. बहुतांश ठिकाणी मतदारांनी ही निवडणूक आपल्या हातात घेतली आहे. उमेदवार किंवा पक्ष कोण आहे याला फार महत्व न देता, मोदींच्या विरोधात जो जिंकून येईल त्याला मतदान करायचे अशी मतदारांची मनोभूमिका दिसते. याचाच उल्लेख मोदी आता व्होट जिहाद म्हणून करीत आहेत. जेव्हा मतदार २०१४ मध्ये काँग्रेसच्या विरोधात असेच मतदान मोदींना करीत होते तेव्हा त्याला मिडियावाले मोदी लाट म्हणत होते. पण आता मात्र मोदी आणि तेच मिडियावाले आपल्याविरोधी जाणाऱ्या मतांना वोट जिहाद असे म्हणत आहेत. साध्या भाषेत याला हलकटपणा म्हणतात. जिहाद वगैरे म्हणून धार्मिक स्वरुप देण्याचा प्रयत्न खुद्द देशाच्या पंतप्रधानांनी करावा इतकी भारतातील राजकारणाची पातळी कधीही खाली गेली नव्हती. मुंबईमध्ये पूर्वी अनेकदा जातीय दंगली झाल्या आहेत. भीषण बाँबस्फोटही झाले आहेत. पण तरीही हे शहर व महाराष्ट्र भाजपची प्रयोगशाळा होऊ शकला नाही. भाजपच्या नेत्यांना त्याचाच राग आहे व त्याचाच सूड ते या राज्यावर घेत आहेत. येथील राजकारणाचा त्यांनी पूर्ण विचका केला आहे.

### धडा शिकवा

असे करून महाराष्ट्र मोदींच्या मागे उभा राहील असे त्यांना वाटते आहे. पण तो त्यांचा भ्रम आहे. गेल्या दहा वर्षांच्या काळात एकीकडे मुंबईचे महत्व क्रमाक्रमाने कमी करण्याचा मोदीं आणि शाह यांनी प्रयत्न केला. चीन किंवा अमेरिकेच्या राष्ट्रप्रमुखांचे स्वागत अहमदाबादेत करण्यात आले. येथील वित्तीय संस्था, शेअर बाजार आणि हिरा बाजार गुजरातेत हलवण्यासाठी योजना आखल्या गेल्या. महाराष्ट्रातले प्रकल्प पळवण्यात आले. नाशिकमधील कांदा शेतकरी अडचणीत असताना त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले. कांदा निर्यातीला परवानगी असती तर त्याला चार पैसे मिळाले असते. मात्र देशात कांद्याचे भाव पडतील अशी सबब देऊन या निर्यातीवर बंदी घालण्यात आली. त्याच वेळी केवळ गुजरातच्या पांढऱ्या कांद्याची निर्यात मात्र खुली करण्यात आली. पूर्वी गुजरातच्या विधानसभा निवडणुकांच्या काळात खाकरा या गुजराती पदार्थावरचा जीएसटी कमी करण्यात आला होता. त्यामुळे मोदी व शाह यांचे गुजरात-प्रेम वारंवार दिसले आहे. आतादेखील मोदींनी मुंबईत रोड शो केला तो घाटकोपरमध्ये गुजराती वस्तीत. इतर ठिकाणी तो करण्याची एकतर त्यांची हिंमत नसावी किंवा त्यांना त्याची गरज वाटली नसावी. आणि, इतके सर्व करूनही मराठी जनतेने आपल्याला मते द्यावीत अशी त्यांची इच्छा आहे. मुंबईत गुजराती सोसायट्यांमध्ये ठाकरे गटाच्या प्रचारकांना येऊ दिले गेले नाही. अनेक इमारतींमध्ये मराठी माणसांना फ्लॅट विकत घेतला जाऊ दिला जात नाही. मांस-मच्छी खाणाऱ्यांना आमच्या सोसायटीत जागा नाही असे उघडपणे सांगितले जाते. मोदी-शाह यांचा भाजप या प्रकारच्या वागणुकीला फूस देत असता. दुसरीकडे मते मिळवण्यासाठी तो कोणत्याही थराला जाऊ शकतो. त्यासाठी तिने शिंदे व अजित पवार यांच्यासारख्यांना हाताशी धरले आहे. तत्व इत्यादींचे या नेत्यांना कसलीही चाड नाही. सत्ता मिळवण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. या सर्वांच्या महायुतीला धडा शिकवण्याची जबाबदारी मुंबईकरांवर आहे. ते ती पार पाडतील यात शंका नाही.

विचार

# माहोल शेवटच्या टप्प्यांआधीचा

**लोकसभा निवडणूक शेवटच्या टप्प्यात पोहोचली असताना भाजपला भरपूर जागा मिळतील असे वाटत नाही. मात्र एनडीए आघाडी सत्तेत येण्याची शक्यता आहे. आज देशात महागाई आहे; पण बदल घडवेल एवढा राग लोकांमध्ये नाही. बेरोजगारीही आहे; पण त्यासाठी राज्य सरकारांनाही दोष दिला जात आहे. भ्रष्टाचाराबाबतही तेच बोलले जात आहे. परिणामी, मोदींची बोट पैलतिरी जाऊ शकते परंतु 'चारसो पार' होणार नाही, हे ही खरे.**

जनार्दन पाटील

लोकसभेच्या निवडणुकीचे आतापर्यंतचे टप्पे पार केल्यानंतर काही निष्कर्ष समोर येत आहेत. २०१४ च्या निवडणुकीत काँग्रेसविरोधी लाट होती. २०१९ च्या निवडणुकीत पुलवामाचा हल्ला आणि त्याला बालाकोटमध्ये दिलेल्या उत्तरामुळे देशप्रेमाची लाट होती. आताच्या निवडणुकीत कोणताही वारा नाही, लाट नाही. मतदार निराश झाले आहेत. निवडणूक आयोग, राजकीय पक्ष आणि सेलिब्रिटींच्या आवाहनाकडे पाठ फिरवून मतदार मतदान करण्याचे टाळत आहेत. त्यामुळे मतदान कमी झाले आहे. मोदी यांच्या दहा वर्षांच्या कारभारामुळे 'अँटी इन्कंबन्सी'चा थोडा फटका बसणार आहेच; परंतु तो बसू नये, म्हणून तर मोदी आणि भाजपने अन्य पक्षांमध्ये फूट पाडून अनेकजणांना बरोबर घेतले. तेलंगणा, उत्तर प्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू, महाराष्ट्रामध्ये नव्या मित्रांची भर घातली. सत्ताधारी पक्ष कोणत्या मानसिकतेतून निवडणुकीला सामोरे जातो, यावर कार्यकर्त्यांचेही म नोबल ठरत असते. दहा वर्षांची सत्ता आहे. विरोधात जनमत आहे, म्हणून भाजपने हार खाल्ली नाही; उलट विरोधकांच्या थाटात आरोपांचा आणि टीकेचा भडीमार करत आक्रमक पद्धतीने निवडणुकीला सामोरे जाण्याची व्यूहनीती भाजपने आखली आहे. 'चारसो पार'चे ध्येय ठरवताना विरोधकांना काही उमजू नये, ते कायम दबावाखाली राहतील आणि चुका करत राहतील; त्याचा फायदा उठवता येईल, ही नीती भाजपने अवलंबली. ती किती बरोबर होती, हे हतबल विरोधकांच्या क्रिया, प्रतिक्रियांवरून दिसते. मोदी यांच्या कारभारात चुका झाल्या असतील, त्यांची धोरणेही चुकली असतील; परंतु ती धूर्तपणे मांडण्यात विरोधक कमी पडले असे आतापर्यंतच्या चार टप्प्यांच्या मतदानावरून दिसते.

लोकसभेची आत्तापर्यंतची निवडणूक आक्रमक सत्ताधारी आणि बचावाच्या पावित्र्यातील विरोधक अशीच झाली. त्यात कोण किती बरोबर हा संशोधनाचा भाग आहे. मुद्दे नसताना मोदी यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्याची चिरफाड केली आणि त्याच्यावर मुस्लिम लीगची छाप असल्याचा आरोप करून मोकळे झाले. हिंदू महासभेने मुस्लिम लीगशी कशी युती केली होती, हे सांगण्याचा प्रयत्न विरोधक करत असताना मोदी लगेच पुढच्या आरोपाकडे वळले. मुस्लिमांचे आरक्षण, लव जिहाद आदी मुद्दे मांडून त्यांनी ध्रुवीकरणाचा मुद्दा पुढे रेटला. राहुल गांधी यांनी ओबीसींच्या जातगणनेचा आणि संविधान रद्द करण्याचा मुद्दा ऐरणीवर आणला. राज्यघटना बदलण्यासाठी भाजपला बहुमत हवे, असे ते सांगत राहिले; परंतु काँग्रेस सत्तेवर आली तर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती तसेच ओबीसींचे आरक्षण काढून मुस्लिमांना देईल, असे सांगत मोदी ध्रुवीकरणाच्याच मुद्यावर चिकटून राहिले.

फारूक अब्दुल्ला, मणिशंकर अय्यर आणि विजय वडेट्टीवार यांनी मोदी यांच्या हाती 'देशप्रेमा'चा मुद्दा आयता दिला. खरे तर पहिल्या तीन टप्प्यांमध्ये त्याचा कुठेच उल्लेख होत नव्हता; परंतु काँग्रेस देशद्रोह्यांची कशी भलामण करते, अजमल कसाबचा काँग्रेसजनांना कसा पुळका आला, सोनिया गांधी यांनी बाटला हाऊस प्रकरणातील दहशतवाद्यांबद्दल कसे अश्रू ढाळले, अशा कथा रचल्या गेल्या. दहशतवादामुळे ज्या गांधी परिवारातील दोन पंतप्रधानांचा बळी गेला, त्यांच्याच कुटुंबीयांवर देशद्रोह्यांना मदत करत असल्याचा आरोप करत आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यात मोदी यांना यश आले. त्यावर काँग्रेसजणांनी कितीही स्पष्टीकरण दिले, तरी मोदी यांच्या आक्रमकतेपुढे ते कमी पडले. पाकिस्तानचा मुद्दा या निवडणुकीत नव्हता. कुठे काय बोलावे, याचे भान नसले की काय होते, हे आता काँग्रेसजनांना पटले असेल. पाकिस्तानकडे अणुबाँब आहेत. त्याच्याशी आदराने वागावे. पाकिस्तानने काही बांगड्या भरल्या नाहीत, असे वक्तव्य करण्याची काँग्रेसजनांना खरे तर काहीच गरज नव्हती. परंतु हे भान नसल्याने मोदी यांच्याकडे फूलटॉस टाकल्यावर ते षटकार ठोकल्याशिवाय राहत नाहीत, हे अनुभवाने माहीत असताना काँग्रेसजन त्याच त्या चुका करत राहिले. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना ११ जून रोजी अणुबाँबची चाचणी घेतली होती, याचा गौरव करताना मोदी हे काँग्रेसजनांना पुन्हा पाकिस्तानधार्जिणे ठरवून मोकळे झाले. वास्तविक, इंदिरा गांधी यांनी अणुबाँबची चाचणी केली होती; परंतु काँग्रेसजनांना श्रेय घेण्याऐवजी अपयशाचे धनी व्हावे लागले. देशात अनेक मूलभूत प्रश्न आहेत. कांदा निर्यात, द्राक्षांचा भाव, शेतीमालाच्या भावात हस्तक्षेप, किमान हमीभाव, महागाई, बेरोजगारी असे अनेक मुद्दे असताना भाजपला या मुद्द्यावरून चर्चाच होऊ द्यायची नव्हती. राहुल गांधी, प्रियांका गांधी भाजपला वारंवार याच मुद्यावर आणण्याचा प्रयत्न करत होते; परंतु काही नेते मोदी आणि अमित शहा यांच्या हाती आयते कोलित देत होते. त्यामुळे निवडणूक मूलभूत प्रश्नांऐवजी भावनिक मुद्द्यांकडे नेता आली. त्यातच भाजपचा फायदा आहे. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, बिहार आणि कर्नाटक या चार राज्यांमध्ये लोकसभेच्या १४६ जागा आहेत. या राज्यांमध्ये भाजपने अन्य पक्ष फोडून नवे मित्र जोडले असले तरी पूर्वीइतक्या जागा टिकवण्याचे मोठे आव्हान आहे. या १४६ जागांपैकी ३३ जागा विरोधकांकडे होत्या. आता भाजपचे महाराष्ट्र, बिहार आणि कर्नाटकमध्ये काही जागांचे नुकसान होऊ शकते. मध्य प्रदेश, राजस्थान, हरयाणा, पंजाब आणि दिल्लीतही काही जागांचे नुकसान होऊ शकते. छत्तीसगड, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि झारखंड, ओडिशा आदी राज्यांमध्ये भाजपचा काही प्रमाणात फायदा होण्याची शक्यता आहे; परंतु अन्य मोठ्या राज्यांमध्ये होणाऱ्या नुकसानीच्या तुलनेत हा फायदा कमी असेल. अलिकडेच मोदी यांनी अयोध्येत दर्शन घेतले. संकेत स्पष्ट आहे, भाजप पुन्हा मूळ स्थितीत आल्याचे दर्शवते. पहिल्या चार टप्प्यांमध्ये भाजपचे नुकसान झाले तर ते फार मोठे नसेल; मात्र पहिल्या चार टप्प्यांमध्ये भाजपची प्रगती होताना दिसत नाही. तामिळनाडू आणि केरळमध्ये भाजपला फारसा फायदा होताना दिसत नाही. उलट, लोकसभा निवडणुकीत कर्नाटकमधील किमान दहा जागा गमावण्याचा धोका त्यांना सहन करावा लागू शकतो. उर्वरित तीन टप्प्यांमध्ये महाराष्ट्र, बिहार, बंगाल, उत्तर प्रदेशमध्ये काही जागांवर निवडणूक होणार आहे. कोणतीही राष्ट्रीय लाट, कोणताही राष्ट्रीय मुद्दा, राष्ट्रीय कथन नसल्यामुळे, स्थानिक जातीय समीकरणे, स्थानिक सामाजिक अभियांत्रिकी, प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व आणि स्थानिक नेत्यांच्या महत्त्वाकांक्षा यामध्ये निवडणुका अडकून राहतात. भाजप राम मंदिर, भारत निर्माण आणि मोदींची हमी या त्रिकोणाचा आधार घेत आहे. पंतप्रधान प्रयोगामागून प्रयोग करत आहेत. कधी ते पाकिस्तानला मध्ये आणतात, कधी मंगळसूत्र हिसकावतात तर कधी त्यांच्या नजरेत राहुल गांधी सुलतान, राजे, निजाम यांचे मदतनीस बनतात. संपूर्ण निवडणूक हिंदू-मुस्लिम अशा विभागणीमध्ये व्हावी; जेणेकरून मूळ मतदार उत्साहाने मतदान करण्यासाठी येतील आणि तरंगत्या मतदारांना सोबत घेऊन जाता येईल, हा यामागचा उद्देश आहे; परंतु हे फार मोठ्या प्रमाणावर होताना दिसत नाही. बिहारमध्ये नितीशकुमार यांना परत आणणे आणि महाराष्ट्रात शिवसेनेसह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडूनही परिस्थिती फलदायी ठरत नाही. अशा परिस्थितीत हिंदुत्वाबद्दल बोलणे ही राजकीय मजबुरी आणि आवश्यकताही आहे.

आताही मोदी विरोधकांकडून एखादी चूक होण्याची वाट पहात आहेत. लालूप्रसाद यादव यांनी मुस्लिमांना आरक्षण देण्याचे बोलून चूक केली आणि नंतर मंडल आयोगाबाबत बोलून ती सुधारली. कर्नाटक आणि तेलंगणाच्या मुस्लिम आरक्षणावर मोदी बोलतात आणि त्यांच्याच राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्ष असलेला तेलुगु देसम पक्ष जाहीरनाम्यात मुस्लिम आरक्षणाचा मुद्दा मांडतो. त्यावर विरोधकांना मोदी यांची कोंडी करता आली नाही. 'इंडिया' आघाडी महागाई, बेरोजगारी, अग्निवीर, आरक्षण रद्द करणे, जात जनगणना आदी मुद्दे मांडत आहे. 'चार सौ पार' या घोषणेला घटनेतील बदलांशी जोडण्याचे आख्यान उत्तर भारतात कार्यरत असल्याचे दिसते; परंतु आरक्षण संपुष्टात येण्याच्या भीतीने दलित आदिवासी मतदार त्रस्त झाले तर त्याचा फटका सवर्णांसह ओबीसी मतदारांनाही बसतो. काँग्रेससह अनेक पक्षांचे जाहीरनामे सामाजिक सुरक्षेवर भर देतात. भाजपच्या ठरावपत्रातही असेच काहीसे म्हटले आहे; पण भाजपने त्याचा उल्लेखही थांबवला. राष्ट्रीय मुद्द्यांवर निवडणुका होत नाहीत, तेव्हा स्थानिक मुद्द्यांवर प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व असते. अशा स्थितीत विरोधक शर्यतीत येतात आणि स्पर्धा करताना दिसतात; आज देशात महागाई आहे; पण राग एवढा नाही की सत्ता बदल घडवेल. बेरोजगारी तर आहेच; पण राज्य सरकारांनाही दोष दिला जात आहे. भ्रष्टाचाराबाबतही तेच बोलले जात आहे. त्यामुळे संताप, चीड आणि संतापाचे प्रमाण धोक्याचे चिन्ह ओलांडू शकलेले नाही. परिणामी, मोदींची बोट पैलतिरी जाऊ शकते परंतु 'चारसो पार' होणार नाही, हे ही खरे.

आजकाल

# आम्हाला आमच्या अधिकाराची जाणीव आहे काय?

वसंत सर्वे

जर जनरल बोगीत केवळ ८० सीट्स आहेत तर रेल्वे व्यवस्थापन ८०च तिकीट कां देत नाही तिकिटाचे पैसे दिले तर सीट्स मागण्याचा नागरिकांचं अधिकार नाही कां?

जशी ट्रेन सुरु झाली,

एक बाई आणि तिचा पती एक लोखंडी पेटी घेऊन घाईघाईने गाडीत चढले.

बाई तर दरवाजाजवळच बसली पण माणूस चिंतातुर उभा होता. त्याला माहित होते की त्यांच्या जवळ जनरल डब्याचे तिकीट आहे आणि हा रिझर्वेशनचा डब्बा आहे. टीसी ला तिकीट दाखवत त्याने हात जोडले.

''हे जनरलचे तिकीट आहे. पुढच्या स्टेशन वर जनरल डब्ब्यात जाऊन बसा, नाहीतर आठशे ची पावती बनेल.'' असे बोलून टीसी पुढे निघून गेला. पति-पत्नी दोघे मुलीला पहिला मुलगा झाला म्हणून त्याला बघायला चालले होते. शेठनी मोठ्या मुश्किलीने दोन दिवसांची सुट्टी आणि सातशे रुपये एडवांस दिले होते.

पत्नी व लोखंडी पेटी घेऊन जनरल डब्यात प्रयत्न केला पण घुसू शकले नाही. लाचार होऊन स्लिपर क्लास मध्ये आले होते.

''साहेब, पत्नी व सामान घेऊन जनरल डब्यात चढू नाही शकलो. आम्ही येथेच कोपऱ्यात उभे राहू. खूप मेहरबानी होईल.'' टीसी ला शंभर रुपयांची नोट देत म्हणाला. ''शंभर मध्ये काही होत नाही. आठशे काढ नाहीतर उतरून जा.''

''आठशे तर गुड्डीच्या बाळंतपणाला ही लागले नाही साहेब. नातूला बघायला चाललो आहोत. गरीब लोकं आहोत, जाऊ द्या ना साहेब.'' यावेळी पत्नी ने म्हटले

''मग असं करा, चारशे काढा. एकाची पावती बनवून देतो, दोघे बसून रहा.''

''हे घ्या साहेब, पावती राहू द्या.'' दोनशे रुपये देत माणूस बोलला.

''नाही-नाही पावती तर बनवावीच लागेल. वरूनच हुकूम आहे. पावती तर बनेलच. चला, लवकर चारशे काढा, नाहीतर स्टेशन येत आहे, उतरून जनरल डब्यात निघून जा.'' टी सी यावेळी काहिसे रागावून बोलला.

माणसाने चारशे रुपये असे दिले जसे काळीज काढून देत आहे.

दोघे पति-पत्नी उदास, रडवेले होऊन असे बसले होते, जसे नातू चा जन्म झाल्यामुळे नाही तर त्याच्या अंत्यसंस्कारासाठी चालले आहेत.

कसे ॲडजस्ट करतील हे चारशे रुपये? परतीच्या तिकिटासाठी व्याह्यांकडून पैसे मागावे लागतील का?

नाही-नाही.

शेवटी पति बोलला- ''शंभर- दिडशे तर मी जास्तच आणले होते. गुड्डी च्या घरी पायीच जाऊ. सायंकाळी जेवायचं नाही. दोनशे तर ॲडजस्ट होऊन जातील. आणि हा, येतांना पॅसेंजर ने येऊ. शंभर रूपये वाचतील. एक दिवस जरूर जास्त लागेल. शेठ पण ओरडेल. पण मुन्ना साठी सर्व सहन करुन घेईन. पण तरीही हे तिनशेच झाले.''

पत्नी म्हणाली, ''असे करुया, बाळाच्या हातात आजी-आजोबांकडून जे शंभर-शंभर देणार होतो ना, आता दोघे मिळून शंभरच देऊ. आपण वेगळे थोडेच आहोत. झाले ना चारशे ॲडजस्ट.''

''पण बाळाला द्यायचे कमी करने....'' आणि पतिच्या डोळ्यात पाणी आले.

''मन कशाला जड करता वो, गुड्डी जेव्हा बाळाला घेऊन घरी येईल, तेव्हा दोनशे जास्त देउन देऊ.'' असं म्हणताना तिचेही डोळे भरून वाहू लागले.

मग डोळे पुसत म्हणाली- ''जर मला कुठे मोदीजी भेटले तर सांगेन- ''इतक्या पैशांची बुलेट ट्रेन चालवण्या पेक्षा इतक्या पैशांनी प्रत्येक ट्रेन मध्ये चार-चार जनरल डब्बे लावून द्या, ज्यामुळे आपल्या सारख्यांना तिकीट असूनही बेइज्जत व्हावे लागणार नाही व बाळाच्या हातात द्यायचे शंभर रुपये ही कमी होणार नाहीत.'' तिचे डोळे परत वाहू लागले.

''अगं वेडे, आपण गरीब माणसं आहोत, आम्हाला मतदान करण्याचा तर अधिकार आहे, पण सल्ला देण्याचा नाही. रडू नको.

(एक नम्र विनंती आहे, ज्याची ही कथा वाचून झाली त्याचे या घटनेशी काही घेणे नसले तरी ही कहानी शेयर करा, कॉपी पेस्ट करा पण संबंधित व्यक्तींपर्यंत ही पोहोचू द्या जेणेकरून रेल्वे मंत्रालय जनरल डब्यांचीही परिस्थिती समजू शकेल ज्यात प्रवास करणारा एक गरीब वर्ग ज्याचे अनंतकाळापासून शोषण होत आले आहे. एक पाऊल परिवर्तनाकडे.

लोकसंसद

### हवामान बदलाचा परिणाम मानसिक स्वास्थावर

हवामान बदलाचा परिणाम आता भूतलावरील विविध गोष्टींना जाणवू लागला आहे. हवामान बदलामुळे नकारात्मक परिणाम माणसाच्या मानसिक स्वास्थ्यावर होत असल्याचे दिसून आले आहे. अल्झायमर व अर्धशिशी या आजाराचे प्रमाण वाढलेले आहे. हे संशोधन 'लॅन्सेट न्यूरोलॉजी जर्नल' या नियतकालिकात हे प्रसिद्ध झाले आहे. तापमानातील चढ उतारामुळे मेंदूच्या आजारावर सुद्धा त्याचे परिणाम आता होत आहेत. मेंदूचा पक्षाघात, मेंदूज्वर,यासारख्या आजाराची तीव्रता वाढत असल्याचे दिसून येते ही बातमी नुकतीच वाचली. रात्रीचे तापमान वाढल्यामुळे मेंदूच्या पक्षाघाताचा झटका येण्याच्या केसेस सुद्धा वाढत आहेत. एकूणच हवामान बदलाची ही व्याप्ती फारच मोठी होऊ लागली आहे. तापमान वाढीमुळे पक्षांच्या वर सुद्धा परिणाम होऊ लागले आहेत. त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी आता मानवी वस्तीत जाण्याची वेळ आली आहे. हे सारे अनेक गोष्टीमुळे घडून येत आहे. भारतात केवळ २०१८ ते २०२२ या कालावधीत सुमारे ५० लाखाहून अधिक झाडे तोडली असल्याचे दिसते . हे नुकतेच 'नेचर सस्टेनेबिलिटी' या अहवालात म्हटले आहे. या अहवालानुसार तेलंगणा व महाराष्ट्रात सर्वाधिक झाडे नाहीशी झाली आहेत.

**- शांताराम वाघ**, पुणे

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२० मे**

**१५७१:-** शके १४९३ च्या प्रजापती संवत्सरी वैशाख व १२ रोजी प्रसिध्द भगवत्भक्त 'केवलचैतज्ञ' मूळ नाव 'विश्वनाथ' समाधिस्त झाले. 'भक्तिप्रसाद', 'वैकुंठपद', 'वासनामय देह', 'गीता भागवत सार, आणि परमार्थ विचार' या ग्रंथासह काही पदे त्यांनी रचली आहेत. **१८५०:-** आधुनिक मराठी गद्याच्या सन १८०० पासूनच्या नवपरंपरेला अधिक प्रभावी रुप प्राप्त करुन दिल्यामुळे 'आधुनिक मराठी गद्याचे जनक' म्हणून ओळखले जाणारे विष्णुशास्त्री कृष्णशास्त्री चिपळुणकर यांचा जन्म. 'मालाकार' अशीही ख्याती असलेल्या विष्णुशास्त्रींची 'निबंधमाला' (खंड १ते ३) पुढे ग्रंथरुप झाली. 'विनोद व महादाख्यायिका', 'विद्वता आणि कवित्व व वक्तृत्व' अशी सैध्दांतिक, तर 'संस्कृत कविपंचक', 'सुभाषित', 'मयूरकविविरंचित मुक्तामाला' ही संपादित पुस्तके त्यांच्या वाङ्:मयाभ्यासाची साक्ष देतात. वडील कृष्ण शास्त्री यांच्या निवडक लेखांचा संग्रह विष्णुशास्त्री यांनी दोन भागांत केला. **१८८४:-** लेखक, भाषावैज्ञानिक डॉ. पांडुरंग दामोदर गुणे यांचा जन्म. जर्मन विद्यापीठातून पी एच. डी ची पदवी संपादन करणाऱ्या गुण्यांनी 'जर्मनीतील लोकशिक्षण', 'मराठी कवितेच्या पूर्वीच्या व हल्लीच्या स्थितीविषयक तुलनात्मक प्रासंगिक विचार', 'माझा युरोपचा प्रवास', 'मराठी भाषेचे कालनिर्णय', 'अपभ्रंश भाषेतील वाङ्:मय' इ. पुस्तके लिहिली. 'ऐतिहासिक भाषाविज्ञान' हा विषय विद्यापीठात स्थिर करण्यास त्यांचे मोठे योगदान आहे. **१९०३:-** ग्रंथकार, अनुवादक, बुद्धीप्रामाण्यवादी विचारवंत ॲड. वसंत भगवंत कर्णिक यांचा जन्म. ते मराठी व इंग्रजी भाषेतील एक सिध्दहस्त लेखक. त्यांनी कामगार नेते 'ना. म. जोशी' आणि 'मानवेंद्रनाथ रॉय' या दोघांची त्यांनी इंग्रजीत लिहिलेली चरित्रे गाजली. याशिवाय 'अमेरिकेतील कामगार चळवळ', 'कामगार संघ आणि औद्योगिक संबंध' ही कामगार चळवळीसंबंधीची पुस्तके तसेच 'ध्रुवाचा अस्त', 'सामाजिक करार', 'स्वातंत्र्याविषयी' ही अनुवादीत पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९१३:-** लेखक, संगीत व योगाभ्यासाचे, कुस्तीचे व्यासंगी वसंत गणेश देवकुळे यांचा जन्म. ह्यांनी 'छापखाना कसा काढावा?', 'दर आकारणी', 'महिलांसाठी योगासने', 'माझा रोजचा व्यायाम कोणता?', 'मुद्रण व्यवस्थापन', 'योगासने', 'शवासन', 'संघच का आणि कसा?' अशी ग्रंथसंपदा. **१९२३:-** लेखक, 'शिरीष' या दिवाळी अंकाचे संस्थापक आणि 'कलाविश्व' या त्रैमासिकाचे संचालक गजानन आत्माराम गांगल यांचा जन्म. 'आठवी कला' हा विद्यार्थ्यांसाठी चित्रकलेवरील ग्रंथ आणि 'कलासरग्रहण' या पुस्तकांचे सहलेखक याशिवाय 'छोट्यांसाठी चित्रकला', 'डिझाइन फॉर डेकोरेशन', 'दोन तासात एस. एस सी. चित्रकला', 'मेमरी ड्रॉइंग' या पुस्तकातून चित्रांचे विविध प्रकार काढण्याची शास्त्रशुध्द माहिती अशी ग्रंथसंपदा. **१९३६:-** लेखक, प्राचार्य डॉ. मुरलीधर मनोहर जावडेकर यांचा जन्म. ह्यांनी 'प्रीती मिळेल का हो?', 'मस्तानीचा बाजीराव', 'सोचा विजय असो' या नाटकांसह 'पराभवाची रहस्ये' हा ग्रंथ. याशिवाय 'महाराष्ट्रातील वैज्ञानिक क्रांती' या ग्रंथातून मराठीतील 'विज्ञान वाङ्:मयाचा अभ्यास' तसेच 'साहित्यातील प्रीती आणि भक्ती' हा आणखी एक ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. **१९४०:-** शिवकालीन विषयांचे लेखक तुकाराम विजयानंद जाधव यांचा जन्म. 'गिरीदुर्ग आम्हा सगेसोयरे', 'शिवरायांचा आठवावा प्रताप', 'श्रीमंत योगी' ह्या तीन शिवग्रंथांच्या पुस्तकांसह स्वामी विवेकानंदाचे चरित्र सध्या ते लिहित आहे. **१९४४:-** कवी रामचंद्र परब यांचा जन्म. 'विसावा' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला असून त्यास शांताराम नांदगावकार यांची प्रस्तावना लाभली आहे. **१९४७:-** लेखिका प. पू. शकुंतला जयंत आगटे यांचा जन्म. भगवान श्रीकृष्णभक्ती आणि श्रीसद्गुरुचरणी असलेला प्रगाढ विवास यातून निर्माण झालेले सर्व साहित्य. तत्त्वज्ञानपर, सद्गुरुस्तुतीपर भगवानस्तुतीपर अभंगांचे तसेच ज्ञानोत्तर भक्तीतून स्फुरलेल्या विरहिणी इत्यादी वाङ्मयाचे, व्रजकथांचा आधारे, महायोगाच्या अंगाने उलगडलेले अर्थविवरण हे लेखनाचे ठळक वैशिष्ट्य. सामान्य साधकांना शास्त्रग्रंथांचा पूर्वाभ्यास नसताना देखील समजेल अशा सोप्या भाषेत आध्यात्मिक तत्त्वे स्पष्ट करुन सांगणारी विलक्षण प्रभावी भाषाशैली. सर्वच ग्रंथांतून संतसाहित्याच्या गुढार्थाची अनुभूतीच्या अंगाने केलेली मार्मिक निरुपणे. एकूण ३०च्या वर ग्रंथ प्रकाशित. 'साधना पाथेय', 'कृष्णांजन', 'मुंगी उडाली आकाशी', 'गोपाळकाला', 'पैल तो गें काऊ कोकताहे', 'वारियानें कुंडल हाले', 'कृष्णा मजकडे पाहू नको रे', 'सोनयाचा दिवस आजि अमृतें पाहिला', 'ऊँकार स्वरुपा सद्गुरु समर्था', 'रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा', 'रात्र काळी घागर काळी', 'कृष्णभूल' आदी महत्त्वपूर्ण ग्रंथ. **१९७९:-** कवी शेष सुदाम देऊरमल्ते यांचा जन्म. 'खाऊचे जंगल', 'पाण्याचे गाणे' हा बालकविता संग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९८७:-** 'पुढारी' या वर्तमानपत्राचे संस्थापक, संपादक गणपतराव जाधव यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
९९७५५७६६७५

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० मे

१) श्री. वासुदेव गोपाळ नाबर
विद्यानगर, अलिबाग
२०-०५-१९४५

२) श्री. श्रीनिवास त्र्यंबक जोशी
ब्राह्मणआळी, अलिबाग
२०-०५-१९४९

३) श्री. शंकर गोविंद सुतार
श्रीबाग-२, अलिबाग
२०-०५-१९४५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



कुंवरबाई खेतशी स्मरणार्थ

# ‘राईट टू पी’ प्रश्नावर नगरपंचायतीचे दुर्लक्ष

## तालुक्यात येणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्याची ग्रामपंचायत असलेल्या पोलादपूर शहरासाठी सात वर्षांपूर्वी नगरपंचायत अस्तित्वात येऊनही नगरपंचायतीच्या विकासकामांमध्ये ‘राईट टू पी’ प्रश्नावर सपशेल दुर्लक्ष झाले आहे. ग्रामीण भागातून बाजारहाट, बँका व कार्यालयीन कामकाजानिमित्त शहरात येणाऱ्या स्त्रिया व पुरूषांचे आरोग्य या गैरसुविधेमुळे धोक्यात आले आहे.

पोलादपूर शहरात लता कळंबे या तालुक्यातील माहेरवाशिणीने चार वर्षांपूर्वी महामार्गावरील आरोग्यविषयक गैरसुविधेमुळे महिलांच्या कुचंबणेविरोधात ‘राईट टू पी’ प्रश्नावर तब्बल तीन दिवस उपोषण केले. यानंतर पेट्रोलपंप आणि महामार्गालगतच्या हॉटेल्स व एस.टी. स्थानकामध्ये सार्वजनिक स्वच्छतागृह याप्रश्नी सुसज्ज ठेवण्यासंदर्भात राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभाग तसेच राज्य सरकारकडून निर्णय घेण्यात आला. मात्र, यानंतरही पोलादपूर तालुक्याचे शहर असलेल्या पोलादपूर नगरपंचायतीने याप्रश्नी दुर्लक्ष करणे सुरूच ठेवले असून, या वर्षाच्या प्रारंभी झालेल्या दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीवेळी जाहीरनाम्यामध्ये या विषयाचा उल्लेख करणाऱ्या राजकीय पक्षाला अत्यल्प यश मिळाल्याने आता महिला व पुरूषांसाठी पोलादपूर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी स्वच्छतागृह अथवा मुतारीसदृश्य बांधकामे होणार की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



■ (छायाचित्र : शैलेश पालकर)

पोलादपूर शहरामध्ये तालुक्याच्या ग्रामीण भागातून अनेक महिला व पुरूष, तरूण-तरूणी शिक्षण, बँकेतील कामे, बाजारहाट, दुध व भाजीपाला, शासकीय कार्यालयीन कामकाज तसेच छोट्या मोठ्या नोकरीधंद्यांसाठी येत असून, या सर्वांनाच दिवसभरामध्ये स्वच्छतागृहे तसेच मुतारीची गैरसोय जाणवू लागत आहे. पूर्वी तलाठी सजेच्या मागील भागात एक जुनी पडकी इमारत याकामी वापरात येत असे. मात्र, आता या इमारतीची जीर्णावस्था पाहता इमारतीचा जीर्णोध्दार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

पावसाळ्यामध्ये या प्रश्नाची तीव्रता अधिक असल्याने पोलादपूर नगरपंचायतीने तातडीने महाड नगरपालिकेप्रमाणे मोबाईल स्वच्छतागृहे आणण्याची गरज असून, पोलादपूर नगरपंचायतीचे सत्ताधारी तसेच प्रशासन याकामी तातडीने लक्ष देतील, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

१३ मार्च रोजी भूमीपूजन झालेल्या कामांची यादी तब्बल ११ कोटींहून अधिक किमतीची असून, शहरातील अनेक उपयुक्त आणि सुशोभिकरण तसेच उद्यानाच्या कामांमध्ये या ‘राईट टू पी’ प्रश्नावर महिला आणि पुरूषांसाठीच्या मुतारीसाठी बांधकाम होऊ शकले नसल्याने शहरातील विशेषत आजूबाजूच्या गावांतून शहरात आलेल्या स्त्री-पुरूषांमध्ये काहीशी नाराजी व्यक्त होताना दिसून येत आहे.

# अलिबागमध्ये हातमाग कापड प्रदर्शन



**। अलिबाग । वार्ताहर ।**

अलिबाग शहरात हातमाग कपडचे प्रदर्शन व विक्री अलिबाग करणे खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. तरी यावेळेस भरपूर नवनवीन प्रकार उपलब्ध करण्यात आलेले आहे. त्याचा अलिबागकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

भाऊराय हॅण्डलुम सोलापुर यांचे हातमाग कापड प्रसिद्धी व विक्री कार्यक्रमांतर्गत हातमाग कापड प्रदर्शन व विक्रीचे आयोजन केले आहे. दि. ३० मेपर्यंत हे प्रदर्शन सुरु राहणार आहे. स्थळ सार्वजनिक वाचनालय, डोंगरे हॉल, रायगड जिल्हा परिषदेजवळ मुख्य पोस्ट ऑफिससमोर या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी प्रदर्शन प्रमुख पांडुरंग पोतन म्हणाले की यांत्रिक युगामध्ये स्पर्धा करीत सर्व समस्यांशी सामना करून त्यांचे पिढीजात पारंपरिक हातमागावर समृद्धीचे वस्त्र विणण्याचे आणि वस्त्र संस्कृतीच्या अमूल्य ठेवा जोपासण्याचे काम आपले विणकर अविरतपणे काम करीत आहे. त्यांच्या या गतिशील प्रयत्नांना प्रोत्साहन मिळावे व त्यांनी तयार केलेल्या हातमाग कापडाला योग्य बाजारपेठ मिळावी त्याकरिता हातमाग वस्त्रोद्योगमध्ये काम करणाऱ्या संस्थांचे योगदान मिळून बळकटीकरण व सक्षमीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.

या प्रदर्शनास अलिबागकरांनी देऊन विणकर कामगारांच्या कलेला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन जास्तीत जास्त प्रमाणात खरेदी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सुती व खादी कापडाच्या विक्रीवर २० टक्के सूट ठेवण्यात आली असून, दि. ३० मेपर्यंत हे प्रदर्शन सकाळी १० ते सायंकाळी ९ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे.


# नवरंग पक्ष्याला मिळाले जीवदान

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

एप्रिल-मे महिन्याने वाढलेल्या उष्म्याने नागरिक, प्राणी, पक्षी त्रासले आहेत. सर्व या उष्म्यापासून थंडगार सावली आणि पाणी शोधत असतात. पनवेल परिसरात शनिवारी इंडियन पिट्टा म्हणजे नवरंग पक्ष्याचे दर्शन घडले. हा पक्षी पावसाचे संकेत देत असतो.

दक्षिण भारतातून या पक्ष्याचे आगमन होत असते. पक्षी अभ्यासक माधव आठवले यांचा मित्र अभय जोशी यांना नवरंग पक्षी जखमी अवस्थेत दिसून आला. त्यानंतर त्यांनी लागलीच माधव आठवले यांना फोन केला. त्यांनी तात्काळ घटनस्स्थळी जात नवरंग पक्ष्याला घरी आणून त्याच्यावर उपचार केले.

नवरंगाच्या विणीचा काळ मे ते ऑगस्ट असून, गवत, झाडांचे मूळ, काड्या यापासून बनविलेल्या घरट्यात पक्ष्याची मादी चार ते सहा अंडी देते. पक्ष्यातील नर आणि मादी दिसायला सारखेच असतात. त्यांच्यात निळा, हिरवा, काळा, पांढरा, तांबडा हे भडक रंग प्रामुख्याने दिसतात. हा पक्षी आकारमानाने



मैनेएवढा असून, भुंड्या शेपटीचा आहे. त्याचा पोटाखालचा व शेपटीखालचा रंग किरमिजी असतो. नवरंग पक्षी उडताना पंखांच्या टोकावर ठळक पांढरे ठिपके दिसतात.

झुडपी जंगलात राहणे अधिक पसंत करणारा हा पक्षी आपला बहुतेक वेळ जमिनीवर घालवतो. त्याचा व्हीट-ट्यू असा आवाज सकाळ-संध्याकाळ ऐकू येतो. हा ढगाळ हवेत दिवसभर आवाज करतो.

# मतदारयादीत नाव गायब

**। उरण । वार्ताहर ।**

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत उरण विधानसभा निवडणुकीत अनेक मतदारांची नावे मतदारयादीत नसल्याने त्यांना मतदानापासून वंचित राहावे लागले. कोणत्याही निवडणुका जाहीर झाल्यानंतर महिना दीड महिना आधी मतदार याद्या प्रसिद्ध होत असतात. त्या मतदार याद्या राजकीय पक्षाचे पदाधिकारी घेऊन नावांची तपासणी करतात. मग उरण विधानसभा मतदार संघातील उरणमधील काँगेस पक्षाचे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अकलाख शिलोत्री, उरण शहर उपाध्यक्ष गुफारण तुंगेकर यांच्यासह जवळपास १५० ते २०० मतदारांची नावे मतदार यादीत नसल्याचे उघड झाल्याने ते मतदानापासून वंचित राहिले आहेत.

# विवेक ढेपेंना महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील उसरघर गावचे सुपुत्र तथा विवा कॉलेजचे माणगावचे प्राचार्य विवेक ढेपे यांना आविष्कार फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेतर्फे राज्यस्तरीय महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रविवार, दि.१२ मे रोजी सकाळी ११ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, बाजी प्रभू देशपांडे चौक, पन्हाळगड, जि. कोल्हापूर याठिकाणी पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे न्यूरोसर्जन डॉ. संतोष प्रभू यांच्या हस्ते या पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. विवेक ढेपे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.या पुरस्कार सोहळ्याला फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष पत्रकार संजय पवार, राज्य पुरस्कार निवड समिती सदस्य माधुरी सावंत, फाऊंडेशनचे रायगड जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष किशोर मोहिते आदी मान्यवरांसह राज्यभरातून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गापासून काही अंतरावर पार्ले येथील एका शेतकऱ्याचा अवकाळी पावसाच्या गडगडाट कडकडाटात हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन मृत्यू झाल्याची माहिती पोलादपूर पोलिसांनी दिली. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

पोलादपूर तालुक्यातील पार्ले येथील शेतकरी श्रीधर राजाराम मोरे (६८) यांची हृदयविकारामुळे १९१६ मध्ये बायपास सर्जरी करण्यात आली होती. त्यामुळे धकाधकीच्या जीवनापासून दूर गावी ते एकटेच राहावयास आले होते. त्यांनी शेतीसोबत आंबा उत्पादन, कुकुटपालन, बकरीपालन आदी शेतीपूरक व्यवसाय वाढविले होते. आंबा बागायतीसाठी पाणी देण्याकामी त्यांनी सोलार पंपदेखील फार्महाऊसलगत बसविला होता. गेल्या १४ मे रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्यापूर्वी सोलार पॅनेलखाली त्यांचा मृतदेह आढळून आला. श्रीधर मोरे हे २-३ दिवसांपूर्वीच फार्महाऊसवर राहण्यास गेले असता त्याकालावधीमध्ये तालुक्यात अवकाळी पावसाचा गडगडाट कडकडाट झाला. यामुळे त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची खबर रत्नदीप सुंदरराव मोरे यांनी पोलादपूर पोलीसांना दिली. याप्रकरणी पोलीस नाईक महाडीक हे पोलीस निरीक्षक अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.

# वीजपुरवठा सुरु होण्याआधीच विजेचे खांब कोसळले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्याला वादळी वारा आणि अवकाळी पाऊस याने मोठे नुकसान केले आहे.तालुक्यात सर्व भागात विजेचे खांब कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यात वावे गावातून बेंडसेकडे जाणारी वीज वाहिनी टाकण्याचे काम महावितरणकडून करण्यात आले आहे. मात्र, त्या वीज वाहिनीवरून वीज वाहून नेण्याचे काम कारण्याआधी या वीज वाहिनीचे खांब वादळात कोसळून गेले आहे.



उमरोली ग्रामपंचायत भागातील वावे गावात वीज वाहिन्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्या भागातील बेंडसे गावातून नव्याने बांधण्यात येत असलेल्या शेडमध्ये नेण्यासाठी वीज पोहोचविली जाणार होती. त्यासाठी बेंडसे गावातून आलेली वीज वाहिनी उल्हास नदीवरून वावे गावातून शेड बांधलेल्या ठिकाणी जात होती. ते सर्व विजेचे खांब हे सहा महिन्यांपासून त्या ठिकाणी उभे आहेत. मात्र, त्या विजेच्या खांबांवरून विजेचा प्रवाह सुरु झाला नाही. मात्र, काळाच्या वादळात ते सर्व विजेचे खांब कोसळले. अवघ्या सहा महिन्यात उभे केलेले विजेचे खांब कोसळतात, यावरुन कामाबाबत उलटसुलट चर्चा करण्यात येत आहे. मात्र, २० वर्षांपूर्वी वावे गावात उभे केलेले विजेचे खांब मात्र आजही तसेच सुस्थितीत उभे आहेत. त्यामुळे महावितरणकडून नव्याने आलेले साहित्य हे कोणत्या दर्जाचे आहे हे स्पष्ट होते, असा प्रश्न स्थानिक तरुण कार्यकर्ते गणेश धारणे हे उपस्थित करीत आहेत.

# अशोक कुलकर्णींच्या स्मृतीला उद्धव ठाकरेंचे अभिवादन



**। बोर्लीपंचतन । वार्ताहर।**

शिवसेनेच्या स्थापनेप्रसंगी बाळासाहेब ठाकरे यांच्या एका हाकेवर कट्टर आणि निष्ठावंत शिवसैनिकांची फळी जिथे निर्माण झाली. त्या दादरमधल्या खांडके इमारतीच्या परिसरात शिवसेनेचे दक्षिण मध्य मुंबईचे उमेदवार अनिल देसाई यांच्या प्रचाराची समारोप सभा पार पडली.

यावेळी उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांचे सहकारी असलेले कट्टर शिवसैनिक अशोक काका कुलकर्णी राहत असलेल्या खांडके इमारतीखालील त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी शिवसेनेचे विविध पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोविंद बैकर यांचे तृतीय पुण्यस्मरण



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

सामाजिक क्षेत्रात काम केलेल्या कै. गोविंद बैकर यांचा तृतीय पुण्यस्मरणदिन गुरुवार, दि. १६ मे रोजी माणगाव तालुक्यतील बहुलेवाडी या ठिकाणी संपन्न झाला. यानिमित्ताने गोविंद बैकर यांच्या स्नेहीजणांचा सत्कार व गुणगौरव तसेच ग्रामस्थांना उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.

आई-वडिलांची सेवा हेच पुण्यकर्म या विषयावर या निमित्ताने अजित शेडगे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. आधुनिक काळातील व्यस्त जीवन व कौटुंबिक नातेसंबंध, ज्येष्ठांची होणारी परवड, वृध्दाश्रम तसेच आई वडील यांची सेवा या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यकर्ते, आदर्श शिक्षक सुनील बैकर व कुटुंबियांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर हेमंत बारटक्के, भागोजी पिंगळे, कमलाकर मांगले, बळीराम चोगले, पंढरीनाथ दळवी, रमेश कचरे, भिकू तात्या जाधव, यशवंत तांबट, विजय येलवे, आमिष भौड, राजू थितेकर, राजेश वारगे, कांतीलाल कसबले, रोशन फराडे, सरपंच अनिता सर्फले, ग्रामस्थ, महिला, तरुण, कै. गोविंद बैकर यांचा परिवार मुलगे, मुली जावई नाती आदी उपस्थित होते.

# ऐन सुट्टीतही मुलांना वाचनाचे धडे

## शिक्षक प्रसाद साळवी यांचा स्तुत्य उपक्रम

**। कोलाड । वार्ताहर ।**

शाळेला उन्हाळी सुट्टी लागते कधी आणि आम्ही मौज मजा करतो कधी अशी चिमुकल्यांची स्थिती असते. मात्र, याच चिमुकल्यांना अधिक शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून रोहा तालुक्यातील केंद्र शाळा पुगाव येथील कार्यरत असलेले शिक्षक प्रसाद साळवी हे यावर एक आगळावेगळा उपक्रम राबवत आहेत.

सुट्टीच्या कालावधीत मुलांचा शैक्षणिक विकास व्हावा तसेच सुट्टीतील पूर्ण दिवस विनाकारण उन्हात भटकंती करत जाऊ नये, ही भावना शिक्षक साळवी यांनी लक्षात घेतली. त्यांची बुद्धी, कला, तसेच वाचन, विविध गोष्टी यावर लक्ष वेधून त्यांना विरंगुळा म्हणून त्यांची वैचारिक प्रगल्भतेवर भर देऊन एक अनोखं उपक्रम राबवत आहेत. त्यांच्या या उपक्रमाचे पालक, ग्रामस्थ



कौतुक करत आहेत.

उन्हाळी सुट्टी म्हणजे विद्यार्थ्यांचा जीव की प्राण. मामाच्या गावाला जाणे, खूप फिरणे, उन्हातानातून भटकंती, मोबाईलवर कायम गेम खेळणे, टीव्हीवरील कार्टून पाहणे, साधारणपणे या गोष्टींमध्येच आपली ग्रामीण भागातील मुलं सुट्टीच्या दिवसात अडकलेली दिसतात. पण त्याही पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांची वैचारिक समृद्धी व्हावी, या सुट्टीमध्येदेखील त्यांना वाचनाची गोडी निर्माण व्हावी आणि त्यातून त्यांचे मनोरंजन देखील व्हावे या भावनेतून आपल्या पुगाव शाळेचे उपक्रमशील शिक्षक प्रसाद साळवी यांनी हा एक सुट्टीतला उपक्रम सुरू केला आणि त्याचा भरभरून आनंद येथील बालक घेत आहेत.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सभा उत्साहात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटनाची सभा दिनांक १६ मे रोजी सकाळी ११ वाजता अलिबाग येथे संघटना अध्यक्ष जी.एच. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यावेळी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या सभेत सेवानिवृत्त कर्मचारी यांचा अलिबाग ठिकाणी मेळावा घेण्यात यावा. हा मेळावा जून २४ अखेर तिसऱ्या, चौथ्या आठवड्यात घ्यावा. प्रत्येक तालुक्यातील सेवा निवृत्त कर्मचारी यांनी सहभाग घ्यावा. तालुक्यातील कर्मचारी उपस्थित राहण्याची जबाबदारी जे सदस्य ग्रुपवर ॲक्टिव्ह असतात, त्यांच्याकडे जबाबदारी सोपावावी. येणाऱ्या सदस्यांची सोय व्यवस्थित होत आहे की नाही याकरिता पदाधिकारी यांनी एक शिष्टमंडळ नेमावे. मेळाव्यामध्ये जिल्हा परिषदेमधून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी हे सामाजिक, राजकीय सेवा करत असलेल्यास त्यांना आमंत्रित करावे. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, कॅफो इ. आमंत्रित करावे. कर्मचारी प्रलंबित प्रश्नांकरिता पेन्शन अदालत बोलाविण्याकरिता सीईओंना पत्र देणे, प्रलंबित प्रश्न ज्या कर्मचाऱ्यांचा आहे, त्यांनी सीईओ, एचओडी यांना दिलेल्या पत्राची प्रत संघटनेस देणे. कॅफोंना ऑनलाईन प्रणालीकरिता आवश्यक असणारी माहिती देण्यासाठी पंचायत समितीबरोबर संपर्क साधणे, आदी बाबींबाबत चर्चा करण्यात आली.

या सभेस जी.एच. पाटील, डी.जी. मानकर, ए.बी. पाटील, सुरेश म्हात्रे, किशोर घरत, प्रकाश म्हात्रे, आय.के. दळवी, डॉ. राजू म्हात्रे, डॉ. रवी पाटील, प्रवीण पितळे, श्रीमती सदावर्ते, राणे, भोपी, विजय म्हात्रेंसह पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# आर्या बडेला ९७ टक्के

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील किल्ला येथील ग्रेगोरियन पब्लिक स्कूलच्या सीबीएसई दहावीमध्ये आर्या सुनील बडे ९७ टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे. तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या ग्रेगोरियन पब्लिक स्कूलच्या सीबीएसई दहावी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. शाळेत ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणारे नऊ विद्यार्थी आहेत. यावर्षी ९३ मुले दहावीच्या परीक्षेसाठी बसली होती. त्या सर्व मुलांनी यश मिळवत शाळेची यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

या शाळेत द्वितीय क्रमांक शार्वी आरेकर ९५ टक्के गुण, तृतीय क्रमांक प्रिशा जैन ९४.६ टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे. शाळेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका रेमोल वर्गीस, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# निवडणुकीसाठी एनएमएमटी बसचा वापर

**नवी मुंबई :** राज्यात पाचव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान सोमवार दि. २० मे रोजी पार पडणार आहे. दरम्यान, ठाणे लोकसभा मतदारसंघातील मतदान पार पडणार आहे. मतदारसंघाच्या निवडणूक कामकाजासाठी निवडणूक अधिकारी कर्मचारी तसेच निवडणूक साहित्याचे वाटप करण्यासाठी, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# उन्हाळी रानमेव्याचा गोडवा बहरला, खवय्ये खुश

। माणगाव । वार्ताहर ।

उन्हाळा म्हणजे रान फळांची मेजवानी घेऊन येणारा ऋतू असतो. इतर कोणत्याच ऋतूत न मिळणारी फळे, फुले खास या ऋतूत मिळतात. यामध्ये जांभळे, करवंदे, आठुरणी कोकम आदी फळांचा समावेश असतो. उन्हाळी दिवसात तयार होणारी ही फळे म्हणजे खवय्यांसाठी सुखद असा गोडवा असतो.



उन्हाळ्याची तीव्रता वाढल्यानंतर आंबा, काजू आदी फळांबरोबर सर्वसामान्यांच्या आवडीची असलेली खास अशा गोडव्याची फळे म्हणजे जांभळे आणि करवंदे होत. रानाची मैना म्हणून करवंदांच्या उल्लेख केला जातो. कोकणातील डोंगर रांगात दिसणाऱ्या लहान-मोठ्या विस्तीर्ण अशा करवंदाच्या जाळी म्हणजेच विविध पशुपक्ष्यांसाठी निवारा तर असतोच त्याबरोबरीने उन्हाळी दिवसात हिरव्या पानातून डोकावणारी काळाकभिन्न करवंदांची फळे सर्वांनाच आवडतात. पूर्ण पक्व झालेली ही फळे वरून काळकभिन्न असतात व आतून लालसर रंगांचा गर व काही बिया असतात. आंबट-गोड चवीला लागणारी ही करवंदांची फळे म्हणजे खास उन्हाळ्यातील रानमेवा म्हणून प्रसिद्ध आहेत.

करवंदाची चव फारच न्यारी असते. त्यांपासून सुगरणी चविष्ट चटण्या, लोणची तयार करतात. करवंदांच्या उपयोग टोपल्या, सुपाना लेप देण्यासाठी म्हणुन करतात पिकलेली करवंदे वाळवून पुढील दिवसांसाठी खाण्यासाठी ठेवली जातात. सुकलेल्या या करवंदांचा स्वाद व चव अगदी वेगळाच पण स्वादिष्ट असतो.

करवंदांप्रमाणे डोंगर रांगात जांभळाची झाडे मोठ्या प्रमाणात आढळून येतात. उन्हाळी दिवसात तयार होणारे तुरट गोड चवीची फळे खायला चविष्ट असतात. जांभळाचे आयुर्वेदात असंख्य उपयोग सांगितले आहेत. जांभळे मधुमेहींसाठी खास औषधी म्हणून आहेत. हाडकी, मांसवाली, मनुकांच्या आकाराची तर काही टपोरी असणारी जांभळे खवय्यांसाठी पर्वणी असते. उन्हाळी दिवसात तयार होणाऱ्या या जांभळांना चांगली मागणी असून १५० ते २०० रुपये किलोप्रमाणे ती विकली जातात. करवंदे, जांभूळ बरोबरच लालचुटुक रंगांनी मन वेधून घेणारी कोकमाची फळे ही या ऋतूमध्ये तयार होतात. आमसूल, सरबत तयार करण्यासाठी उपयुक्त असलेली ही फळे गृहिणींच्या खास आवडीची असतात. आयुर्वेदातही या फळांचे अनेक उपयोग, गुणधर्म सांगितले आहेत. ५० ते ६० रुपये किलो प्रमाणे ही फळे विकली जातात. करवंदे, जांभळे, कोकम या बरोबरच आठूरणी, मंदुकली यासह अन्य लहान-मोठी फळे खवय्यांसाठी पर्वणी असते. या रामेव्याव्याच्या विक्रीतून ग्रामीण भागातील अनेक महिलांना हक्काचा रोजगार मिळतो. करवंदे १० ते २० रूपये वाटा विकला जातो. पळसाच्या पानात करवंदाची विक्री केली जाते. रान मेव्यानी भरलेला करवंदाचा द्रोण दिसायला सुंदर व आकर्षक असतो. कोकम ५० ते ६० रुपये किलोने विकला जातो. इतर फळेही रानावनात झाडी झुडपात मिळतात. उन्हाळ्यातील रान मेव्याचा हा गोडवा खवय्यांच्या पसंतीचा असून याची चव वर्षभर मनात रेंगाळत राहते. उन्हाळा ऋतू संपत असताना पुढील काही दिवसांत रानमेव्याचा आनंद भरभरून घेतला जाईल.

> रान फळांना विशिष्ठ गोडवा असतो. हा गोडवा खास उन्हाळी दिवसात चाखायला मिळतो कोकणात खास करून वैशिष्ठ्य पूर्ण असलेली रान फळे आहारात उपयुक्त असून आरोग्यासाठी उपयुक्त आहेत. यांच्या विक्रीतून ग्रामीण भागातील महिलांना हक्काचा रोजगार मिळतो. गृहिणी रान मेव्यातून विविध पदार्थ तयार करतात.
>
> - दर्शना मोंडे, गृहिणी


वटपौर्णिमेच्या निमीत्ताने ही रान मेव्याला चांगली मागणी असते सुवासिनी वाणात आवर्जून या रान फळांनी वाण सजवितात. रान फळांचा हा हंगाम खास वटपौर्णिमेपर्यंत सुरू राहतो. त्यानंतर मात्र रान फळांचा हंगाम निघून जातो.

# ६१३ गावे दरडीच्या छायेत

## रत्नागिरी, रायगड, मुंबईतील ५४ गावे अतिसंवेदनशील; भूवैज्ञानिकांचे सर्वेक्षण

। रायगड । प्रतिनिधी ।

**काहीच दिवसांनी आता पावसाला सुरुवात होणार आहे. या कालावधीत कोकणात दरडी पडण्याची शक्यता असते. कोकणातील शेकडो गावे आजही दरडींच्या सावटाखाली आहेत. कोकणातील ७ जिल्ह्यांतील ६१३ गावे दरडप्रवण आहेत. या गावांपैकी २९९ गावांचे भूवैज्ञानिकांनी सर्वेक्षण केले आहे. सर्वेक्षणाच्या आजपर्यंतच्या प्राप्त अहवालानुसार मुंबई उपनगर, रायगड आणि रत्नागिरी या तीन जिल्ह्यांतील ५४ गावे अतिसंवेदनशील श्रेणीत आहेत.**



सर्वांत जास्त दरडप्रवण गावे असणारा रत्नागिरी जिल्हा आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन जागे झाले असून, सर्व यंत्रणांकडून अहवाल मागवले आहेत. राज्याच्या पश्चिम किनारपट्टीलगतच्या डोंगररांगांमध्ये भूस्खलन होण्याचे प्रमाण जास्त आहे. या संपूर्ण किनारपट्टीच्या भागात अधिक पाऊस पडत असल्याने अशा घटना मोठ्या प्रमाणात घडतात. कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक दरडप्रवण गावे आहेत. येथे ३०३ गावे दरडप्रवण असून, १२२ गावांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. यातील ५ गावे अत्यंत धोकादायक श्रेणीत, ९ गावे मध्यम धोकादायक, ४९ गावे कमी धोकादायक श्रेणीत आहेत. ४१ गावे चौथ्या तर १८ गावे धोकादायकच्या पाचव्या श्रेणीत आहेत. उर्वरित १८१ गावांच्या सर्वेक्षणासाठी ४ ऑगस्ट २०२३ ला कळविण्यात आले असून, त्याचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

संभाव्य दरडग्रस्त गावांचे पुणे येथील जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या भूवैज्ञानिकांमार्फत सर्वेक्षण करण्यात आले आहे. शास्त्रज्ञांनी दरडप्रवण गावांना भेट देऊन पाहणी केली.

डोंगरउतारावरील वृक्षतोड, बेकायदा खोदकाम, पाण्याचा निचरा होणाऱ्या मार्गात अडथळे, पावसाळी हंगामात जमिनीस भेगा पडणे, अस्थिर भूभागावरील बांधकाम ही दरड कोसळण्याची प्रमुख कारण असल्याचे या सर्वेक्षणात दिसून आले आहे. त्याचा अहवाल शासनाला पाठविण्यात आला आहे.

धोका कमी करण्यासाठी भूवैज्ञानिकांनी काही उपाय सुचवलेले आहेत. प्रामुख्याने या परिसरातील खाणकाम आणि उत्खननावर निर्बंध घालण्यात यावे, डोंगरउतारावर वृक्ष तोडण्यास मज्जाव करण्यात यावा, पावसाळ्यापूर्वी डोंगरउतारावर सैल झालेले दगड हटवण्यात यावेत. डोंगरउतारावरील पाण्याचा निचरा वेगाने व्हावा यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात आणि दरडरोधक भिंतीची उभारणी करण्यात यावी यांचा समावेश आहे.

## रेल्वेच्या बाजूला आढळला मृतदेह

**पनवेल :** शहराजवळील सिमरन मोटार्सच्या पाठीमागील कातकरवाडी येथे रेल्वे पटरीच्या बाजूला एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. इसमाचे अंदाजे वय ३० ते ३५ वर्षे, रंग काळा, उंची ५ फुट ६ इंच असून अंगात कोळी उत्सव पेण कोळीवाडा असे लिहिलेले, पांढऱ्या रंगाचा टी शर्ट व लाल रंगाचा टॉवेल परिधान केला आहे. डोक्यावरील केस काळे पांढरे व मध्यम आहेत. दाढी व मिशी काळी-पांढरी वाढलेली आहे. कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीसांशी संपर्क साधावा. रेल्वे स्थानकानजिक सापडलेल्या मृतदेहाबाबत खळबळ उडाली आहे. मृतदेह नक्की कोणाचा आहे याचा थांगपत्ता न लागल्याने वेगवेगळ्या चर्चाला उधाण आले आहे.

# ८७ होर्डिंग्सचे होणार स्ट्रक्चरल ऑडिट

## पालिका आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांचे निर्देश

। पनवेल । प्रतिनिधी ।

वादळी वाऱ्यामुळे घाटकोपर येथील होर्डिंग्स कोसळून १७ जणांचा मृत्यू झाला आहे. ५० पेक्षा जास्त जण या अपघातात जखमी झाले आहेत. या घटनेवरून राज्यभरात अनधिकृत होर्डिंग्सचा विषय ऐरणीवर आला आहे. पनवेल महानगरपालिकेतील होर्डिंग्च्या स्ट्रक्चरल ऑडिटच्या सूचना आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी दिले आहेत.

८७ होर्डिंग्स मालकांना याबाबत पालिकेने नोटिसा बजावल्या आहेत. सात दिवसात ऑडिट रिपोर्ट सादर करण्याच्या सुचना या नोटिसांमध्ये देण्यात आलेल्या आहेत. या व्यतिरिक्त अनधिकृत होर्डिंग्सची माहिती घेण्याच्या सुचना चारही प्रभाग अधिकाऱ्यांना दिल्या असल्याची माहिती उपायुक्त मारुती गायकवाड यांनी दिली. पनवेल तालुक्यात मोठ्या प्रमाणात होर्डिंग्स आहेत. घाटकोपरमधील घटना पनवेलमध्ये देखील घडण्याची दाट शक्यता आहे.

> ८७ होर्डिंग्सचे स्ट्रक्चरल ऑडिटच्या सूचना दिल्या आहेत. यापैकी धोकादायक होर्डिंग्स त्वरित हटविल्या जाणार असुन पालिका क्षेत्रातील इतर अनधिकृत होर्डिंग्सची माहिती घेऊन कारवाई करण्यात येईल.
>
> - डॉ प्रशांत रसाळ (आयुक्त, पनवेल महानगरपालिका)

अनेक सोसायट्या आणि घराशेजारी हे अनधिकृत होर्डिंग्स उभारले आहेत. याबाबत जिल्हा प्रशासनाने पाऊले उचलण्याची गरज आहे.

## खोंडकोल आदिवासी वाडीतील ग्रामस्थ तहानलेले

# गावाला टँकरने करावा लागतो पाणीपुरवठा

। तळा । वार्ताहर ।

तालुक्यातील मौजे खोंडकोल आदिवासी वाडी येथे पाण्याची समस्या गंभीर झाली असून पाण्याची तहान भागविण्यासाठी येथील ग्रामस्थांना पाण्याचे टँकर मागविण्याची वेळ आली आहे.

रोवला ग्रामपंचायत हद्दीत येत असलेल्या खोंडकोल आदिवासी वाडीतील ग्रामस्थ बोरवेल व गावात असलेल्या विहिरीच्या सहाय्याने आपली पाणी समस्या दूर करतात. परंतु गेल्या महिनाभरापासून बोरवेलला पाणी येत नसल्याने तसेच विहिरीने तळ गाठलयाने गावातील पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. जवळपास २५




घरांची वस्ती असलेल्या या वाडीतील ग्रामस्थांना आपली तहान भागविण्यासाठी एक दिवस आड करून स्वखर्चाने पाण्याचे टँकर मागवावे लागत आहेत. पावसाळा सुरू व्हायला अद्याप पंधरा ते वीस दिवस बाकी आहेत. त्यामुळे टँकरने पाणी मागवून आपली तहान भागवावी लागणार आहे.

> आमच्या खोंडकोल आदिवासी वाडीमध्ये २५ घरांची वस्ती असून बोरवेल आणि विहिरीच्या सहाय्याने पाणी पुरवठा होतो. मात्र, हे दोन्ही स्रोत आटल्यामुळे आम्हाला एक दिवस आड करून स्वखर्चाने पाण्याचे टँकर मागवावे लागत आहेत.
>
> - गणेश पवार, ग्रामस्थ खोंडकोल आदिवासीवाडी

## तरुणी बेपत्ता

**पनवेल :** पनवेलमधील एक तरूणी बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. कोणास काही एक न सांगता राहत्या घरातून ही तरुणी कुठेतरी निघून गेल्याची फिर्याद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे. पुजा धनगरे असे या तरुणीचे नाव असून रंग गोरा, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा गोल, केस काळे व लांब असून अंगात हिरव्या रंगाचा पंजाबी ड्रेस, पायात काळी सँण्डल व उंची ५ फुट २ इंच आहे. तिला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. असे वर्णन असून या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ॲड. पुंडलिक मालोरे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

। माणगाव । वार्ताहर ।

येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील प्रथितयश वकील ॲड. पुंडलिक मालोरे यांना आविष्कार फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेतर्फे राज्यस्तरीय ''महाराष्ट्र रत्न गौरव'' पुरस्कार २०२४ ने नुकतेच सन्मानित करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, बाजी प्रभू देशपांडे चौक, पन्हाळगड, जि. कोल्हापूर या ठिकाणी झालेल्या भव्य दिव्य अशा कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे न्यूरोसर्जन डॉ. संतोष प्रभू यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले. ॲड. पुंडलिक मालोरे यांना संस्थेकडून ''महाराष्ट्र रत्न गौरव'' पुरस्कार २०२४ ने सन्मानीत करण्यात आल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

या पुरस्कार सोहळ्याला फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष पत्रकार संजय पवार, राज्य पुरस्कार निवड समिती सदस्य माधुरी सावंत, फाऊंडेशनचे रायगड जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष किशोर मोहिते आदी मान्यवरांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुचाकीची चोरी

**पनवेल :** औषध घेण्यासाठी मेडीकल शॉपमध्ये गेलेल्या इसमाने दुकानाच्या समोर झाडाखाली उभी केलेली दुचाकी चोरुन नेल्याची घटना कळंबोली वसाहतीमध्ये घडली. निलेश दगडे यांनी कळंबोली येथे ऑरेंज केमिस्टमध्ये औषध घेण्यासाठी त्यांची दुचाकी मेडीकल शॉपच्या समोरील झाडाखाली उभी ठेवली होती. औषधे घेवून ते पुन्हा गाडी जवळ आले असता तेथे त्यांची गाडी आढळून न आल्याने सदर गाडी चोरीस गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबतची तक्रार त्यांनी कळंबोली पोलीस ठाण्यात दिली. कळंबोली परिसरात दुचाकी चोरट्यांनी डोके वर काढण्यास सुरूवात केल्याचे या घटनेतून स्पष्ट होते.

# मुरूड तालुक्यात बोटी किनाऱ्यावर विसावल्या

। मुरूड । वार्ताहर ।

बदलत्या हवामानात सातत्याने होत असलेल्या विपरीत उलटसुलट घडामोडी मासेमारी व्यवसायाच्या जीवावर उठल्या आहेत. ऐन हंगाम असूनही मोठी मासळी मिळणे दुरापास्त झाल्याने पावसाळ्यापुर्वीच मुरूड, एकदरा, राजपुरी खाडीपट्यात अनेक मासेमार व्यावसायिकांनी आपापल्या मासेमारी नौका किनाऱ्यावर ओढून शाकारण्यास सुरुवात केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या मेरिटाईम बोर्ड विभागाच्या परिपत्रका प्रमाणे पावसाळ्यातील मासेमारी १ जून ते ३१ जुलै २०२४ पर्यंत बंद राहणार आहे. राजपुरी, एकदरा आणि मुरूड येथील सुमारे ८० यांत्रिक नौका किनाऱ्यावर ओढण्याचे काम सुरू असून नौकांतील अंतर्गत डागडुजीची कामे सुरू करण्यात आल्याची माहिती एकदरा गावातील नाखवा रोहन निशानदार आणि राजपुरी येथील जेष्ठ मासेमारी व्यावसायिक धनंजय गिदी यांनी दिली. सध्या छोट्या यांत्रिक नौकांना जेमतेम सफ ेद कोळीम आणि कोलंबी मिळत असल्याचे निशानदार यांनी स्पष्ट केले. मार्केटमध्ये बाहेरगावाहून आलेल्या म ासळीचे दर गगनाला भिडले आहेत. कोलंबीची आवक देखील कमी असल्याने कोलंबी सोड्याचे भाव १८०० रुपये किलोवर गेले आहेत. अशा परिस्थिती अखेर मासेमारी बंद करणे भाग पडल्याचे राजपुरी येथील धनंजय गिदी यांनी स्पष्ट केले. मांदेली, कोळीम, कोलंबी, बोंबील सारखी छोटी-छोटी मासळी मिळणे अवघड बनले आहे. कधीतरी अचानक अशी मासळी काही नौकांना मिळत असली तरी मिळण्याची निश्चित शाश्वती कोणालाच नाही, असे चित्र दिसून आले. समुद्र उशाशी आणि मासेमार उपाशी असे चित्र मुरूड तालुक्यातील किनाऱ्यावर दिसून आले.

गत वर्षी मासेमारी सुरू झाल्यानंतर वाढते तापमान, अकस्मातयेणारी वादळी परिस्थिती, प्रकल्पाचे दुष्परिणाम, वादळी पाऊस-वारे अशा अनंत अडचणींना मासेमारांना तोंड द्यावे लागले होते.

### कोलंबी सोडे १८०० रु. प्रति किलो

**दिघी, राजपुरी, एकदरा गावच्या कातळावर सुकविलेले कोलंबीचे सोडे पर्यटक आणि मासळी खवय्यांतुन लोकप्रिय आहेत. कोलंबीचे प्रमाण घटल्याने सोड्यांचा भाव देखील वधारला असून प्रति किलो १८०० रुपयांवर गेला आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर, सातारा, ठाणे, नाशिक येथून येत असलेले पर्यटक कोलंबीचे सोडे खरेदीसाठी गर्दी करताना दिसून येत आहेत. कोलंबी सोडे चटणी, सोडे बिर्याणी, सोडे फ्राय, कांदा पोहे-सोडे असे विविध मांसाहारी मेनू स्थानिक पातळीवर तयार करूनही दिले जात आहेत. कोळी महिलांनी तयार केलेला मसाला चविष्ठ असून प्रसिद्ध आहे. मुरुडच्या मासळी मार्केटमध्ये सायंकाळी सोडे विक्रीस येत आहेत.**

## बेलघर ग्रामस्थ रंगले विठ्ठल रखुमाईच्या जयघोषात

। तळा । वार्ताहर ।

तालुक्यातील मौजे बेलघर येथे विठ्ठल रखुमाई मंदिराचा वर्धापन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. १७ व १८ मे अशा दोन दिवस आयोजित करण्यात आलेल्या या उत्सवात बेलघर ग्रामस्थ विठ्ठल रखुमाईच्या जयघोषात रंगल्याचे चित्र पहायला मिळाले. मोहिनी एकादशी निमित्त विठ्ठल रुक्मिणी पालखी सोहळा देखील पार पडला.



आयोजित कार्यक्रमांमध्ये सकाळची काकड आरती, घटस्थापना, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, कीर्तन, सत्यनारायण महापूजा, महिलांसाठी हळदी कुंकू, सांस्कृतिक कार्यक्रम यांचा प्रामुख्याने समावेश होता. वासुदेव अडखले व समस्त हरिपाठ मंडळ यांच्या हरीपाठ व किर्तनाने तसेच लेझिम, ढोल व बाजाच्या जल्लोषात काढण्यात आलेल्या विठ्ठल रखुमाईच्या मिरवणुकीने बेलघर गावाला पंढरीचे स्वरूप प्राप्त झाल्याचे चित्र भासत होते. यामध्ये प्रामुख्याने महिलांचा सहभाग लक्षणीय होता.

दरम्यान, बेलघर ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांच्या उपस्थितीत सोहळ्यातील सर्व नियोजीत कार्यक्रम उत्साहात पार पडले.

## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, कृष्णा शालिनी अपार्टमेंट पहिला मजला रूम नं.१०३, घरत आळी, एस.टी. स्टँडजवळ, अलिबाग/रायगड
- वायशेत येथे मुख्य हमरस्त्यानजीक २ गुंठे प्लॉट वीज, पाणी, वॉलकंपाऊंड, गेट, भराव, शेड व असेसमेंटमधील भाड्याने देणे आहे/विकणे आहे. संपर्क : ७०४५३६६६५२
- शिवानी पेटशॉप अलिबाग येथे कामाकरीता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे ९२७२३८३४७६
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/नापास मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ८ तास ड्युटी, ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना. Contact- ९०४९६५५५२३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# आज जागतिक मधमाशी दिन

आज २० मे हा दिवस जागतिक मधमाशी दिन म्हणून साजरा केला जातो. अँतोन जोंसा या जगप्रसिद्ध मधुमक्षिका पालन तज्ज्ञाचा २० मे १७३४ रोजी स्लोव्हनिया या देशातील गरीब कुटुंबात जन्म झाला. त्यांनी १७६६ मध्ये युरोपात पहीले मधमाशी पालन केंद्र सुरू केले. १७७१ मध्ये त्यांनी मधुमाशीपालनावरील पहिले पुस्तक प्रकाशित केले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने २० मे २०१८ पासून २० मे हा दिवस जागतिक मधमाशी दिन म्हणून घोषित केला. या दिवशी मधमाशांचे संवर्धन करण्यासह कीटकांचे संवर्धन करण्यासाठी जनजागृती केली जाते.

मधमाशी हा पर्यावरणातील अतिशय महत्वाचा घटक आहे. मधमाशी हे जीवसृष्टीला मिळालेले सर्वोत्तम वरदान आहे. मधमाशीला सामाजिक कीटक असे म्हटले जाते. मधमाशा इतर किटकांप्रमाणे एकट्या दुकट्या राहत नाही, तर त्या समूह करून राहतात. त्यांच्या घराला पोळे असे म्हणतात. एका पोळ्यात हजारो मधमाशा असतात. मधमाशा त्यांच्या अन्नाच्या पूर्ततेसाठी फुलातील मकरंद आणि पराग गोळा करतात. मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर परागकणांचे स्थलांतर करतात. त्यामुळे फुलांची बीजधारणा व फलधारणा होते त्यालाच परागीभवन असे म्हणतात. परागीभवनामुळे पीक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होते. हे शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखवले आहे. त्यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहेत. तरीही मधमाशी पालनाबाबत आपल्याकडील शेतकरी अजूनही गंभीर नाहीत. उलट मधमाशांचे पोळे जाळून



त्यांना शेतातून हाकलून देण्याकडेच शेतकऱ्यांचा कल असतो. पूर्वी शेतात, बांधावर, आजूबाजूला सहज नजरेस पडणारी मधमाशांची पोळे आता दिसत नाहीत. मधासाठी पोळे जाळणे, कीटकनाशके फवारणे, मोबाईल टॉवर उभारणे, मधम ाशांविषयी अज्ञान पसरवणे या कारणांमुळे मधमाशी सारखा उपयुक्त जीव नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. परिसरातील मधमाशा नष्ट झाल्या तर त्याचा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. म्हणून आपण सर्वांनी मधमाशांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी पुढे आले पाहिजे. मधमाशांची शास्त्रिय माहिती घेऊन तिचे संगोपन करण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. मध व मेन या बाबीपेक्षा उत्पादनातील वाढ हा महत्वाचा घटक मानून शेतकऱ्यांनी मधमाशी पालनाला अग्रक्रम द्यायला हवा. सरकारनेही याबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करायला हवे. रोजगार निर्मितीला वाव असल्याने मधमाशी पालन हा पूरक उद्योग म्हणून केल्यास ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मधमाशी ही आपल्यासाठी अतिशय महत्वाचे काम करते.

# माथेरान घाटातील गटारे धोकादायक

## नवीन रस्ता वाहून जाण्याची चिन्हे; सा.बां. विभागाचे दुर्लक्ष



**। नेरळ । वार्ताहर ।**

**नेरळ माथेरान हा संपूर्ण ७ किमीचा घाट मार्ग आहे. सुमारे ५ वर्षांपूर्वी या मार्गाचे काम एमएमआरडीएकडून करण्यात आले होते. मात्र त्यानंतर या घाटमार्गात अनेकदा दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या. त्यामुळे या मार्गाच्या बाजूला असलेले गटार बुजली गेली आहेत. तर यंदा या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम देखील नव्याने करण्यात आले आहे. परिणामी बुजलेल्या गटारांमुळे यंदा पाऊसाचे पाणी रस्त्यावर येऊन रस्ता वाहून जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान या पाणी वाहून जाण्याचे मार्ग खुले होणार कधी? असा प्रश्न स्थानिकांमधून विचारला जात आहे.**

ब्रिटिशांनी शोधून काढलेल्या माथेरान या पर्यटन स्थळावर पोहचण्यास आजतागात केवळ दोनच मार्ग उपलब्ध आहेत. रोपवे आणि अन्य दोन ठिकाणी रस्ते बनवावेत अशी मागणी आहे, परंतु माथेरान परिसर हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाने संवेदनशील बनविण्यात आला आहे. त्यामुळे भविष्यात नवीन रस्ते साकारण्याची शक्यता फार दुर्मिळ आहे.

त्यामुळे अस्तित्वात असलेला रस्ता सुस्थितीत ठेवून येणाऱ्या पर्यटकांचा प्रवास हा विनाअडथळा आणि सुखकर तसेच अपघात मुक्त व्हावा यासाठी शासनाकडून २०१८ साली प्रयत्न करण्यात आला होता. त्यामुळे राज्य सरकारने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या माध्यमातून नेरळपासून माथेरानच्या दस्तुरी नाका पर्यंतचा रस्ता तयार करण्याचा निर्णय घेतला आणि या रस्त्याच्या कामासाठी २७ कोटींचा निधी मंजूर केला होता. रस्त्याची रुंदी जागा उपलब्ध असेल त्या ठिकाणी वाढविण्याबरोबर सर्व रस्त्याला दरीकडे असलेल्या धोकादायक बाजूला संरक्षक भिंत आणि रस्त्यावरून पाणी वाहत जाऊन रस्ता खराब होतो हे नेहमीची समस्या लक्षात घेऊन सर्व रस्त्याला सिमेंटची गटारे बांधण्यात आली.

रस्त्यावर वाहने थांबवून ठेवण्यासाठी काही मोकळ्या जागा आणि सुरक्षित प्रवास होण्यासाठी आवश्यक गोष्टी यांची तरतूद एमएमआरडीएने आपल्या या प्रकल्पात केली होती.

माथेरानमध्ये दरवर्षी सगळ्यात जास्त पाऊस होतो. त्यानुसार सह्याद्रीच्या पर्वत रांगेतील सगळ्यात किचकट घाट म्हणून प्रसिद्ध असलेल्या नेरळ माथेरान घाटात दरडी कोसळण्याचे प्रमाण देखील अधिक आहे. या कोसळणाऱ्या दरडींमुळे दगड माती यांचा मलबा डोंगरावरील पाणी वाहून जाण्यासाठी घाटरस्त्याच्या बाजूला असलेल्या गटारात अडकून पडला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी ही गटारे तुंबलेली दृष्टीस पडत आहेत. परिणामी डोंगरावरून वाहून येणारे पाऊसाचे पाणी हे पुन्हा रस्त्यावरून वाहते.

यामुळे रस्त्याची दुर्दशा होते. दरम्यान नुकतेच कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांनी दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर करत नेरळ माथेरान गात रस्त्यात डांबरीकरणाचे काम करत रस्ता सुसज्ज केला आहे. मात्र पावसाचे पाणी रस्त्यावरून वाहिल्यास पुन्हा रस्ता खराब होणार असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने घाटाबाजूचे पाणी वाहून जाण्याचे मार्ग खुले करावेत अशी मागणी स्थानिकांकडून जोर धरत आहे.

> **दरडी रोखण्यासाठी जाळ्या लावण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. अशात येथील घाट रस्त्याच्या बाजूला डोंगराचे पाणी वाहून नेण्यासाठी व्यवस्था असलेली गटारे दरडींच्या मलब्यामुळे बुजली आहेत. हि गटारे स्वच्छ करण्याचे काम होणे गरजेचे आहे. आम्ही पाठपुरावा करत आहोत.**
> **: चंद्रकांत चौधरी, शिवसेना**

> **नेरळ माथेरान घाट रस्त्याच्या बाजूला असलेली गटारे आम्ही दर पावसाळ्यात स्वच्छ करत मोकळी करत असतो. मात्र त्यात माती दगड हा मलबा वाहून येत ती तुंबतात. मात्र यंदा पाऊस सुरु होण्याचा अगोदर ती आम्ही मोकळी करणार आहोत.**
> **– संजीव वानखेडे, उपभियंता, सा.बां. उपविभाग कर्जत**

# कर्जतमध्ये अवकाळीचा महावितरणला तडाखा

**। नेरळ। वार्ताहर ।**

वातावरणात कमालीचा बदल झाल्यामुळे रायगड जिल्हा हवामान विभागाकडून खबरदारीच्या सूचना करण्यात आल्या होत्या. कर्जत तालुक्यात अवकाळी पावसाने दमदार, वादळी वाऱ्यासह हजेरी लावल्याने वीज पुरवठ्याची वाताहात होऊन, तालुक्यात अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला होता. बऱ्याच ठिकाणी उच्चदाब व लघुदाब वाहिनीचे पोल पडले होते, विद्युत रोहित्र निकामी झाले होते. अशा प्रसंगी महावितरण कर्जत तालुक्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम करून खंडित वीज पुरवठा पुर्ववत करण्याचे प्रयत्न करीत होते.

सोमवारी झालेल्या पडझडीमुळे विस्कळीत झालेला वीज पुरवठा पुर्ववत करण्यात येत होता व बहुतांशी भागाचा वीजपुरवठा पूर्वपदावर आला असला तरी अजूनही प्रयत्न सुरु असल्याने ग्राहकांनी सहकार्य करावेत असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

वादळी वाऱ्यामुळे कर्जत तालुक्यात अनेक ठिकाणी विद्युत यंत्रणा कोलमडून पडली. यासह देखील नुकसान झाले. तर पुन्हा १६ मे रोजी संध्याकाळी अचानक अवकाळी पावसाने व घोंगावणाऱ्या वाऱ्याने कर्जत तालुक्यात पुन्हा जोरदार हजेरी लावल्यामुळे महावितरणचा विद्युत पुरवठा विस्कळीत झाला. त्यामध्ये प्रामुख्याने नेरळ इन्कमर उच्चदाब वाहिनीचे ७ पोल, कडाव उच्चदाब वाहिनीचे १७ पोल व अंजप उच्चदाब वाहिनीचे ७ पोल पडल्याच्या घटना संध्याकाळी ७ वाजताच्या सुमारास घडल्या होत्या. यासह लघुदाब वाहिनीचे अंदाजे ५० पेक्षा अधिक पोल पडले आहेत.

या घटनेमुळे कर्जत तालुक्यातील बऱ्याच गावांचा वीजपुरवठा खंडीत झालेला होता. अशा परिस्थितीत वीज ग्राहकांना वीजपुरवठा विना गैरसोय झाली. परंतु नैसर्गिक आपत्तीमुळे क्षतीग्रस्त वीजवाहिन्या, पोल, डीपी इत्यादी महावितरण तर्फे सदर काम लवकरात लवकर करण्याचा अथक प्रयत्न चालू असून, सदर वीजपुरवठा पुर्ववत करण्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहेत.

कर्जत तालुक्यातील वीज ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन महावितरण भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी केले आहे. दरम्यान आतापर्यंत अनेक गावातील वीजपुरवठा सुरळीत सुरु झाला असल्याचे सांगण्यात आले आहे.

# जरांगे पाटलांवर ‘संघर्षयोद्धा’

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मराठा आरक्षण योद्धा शिवश्री क्रांतीसुर्य मनोज जरांगे पाटील यांच्या जीवनावर २१ जूनला चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या सिनेमाबाबत सिने रसिकांसोबतच मराठा बांधवांमध्ये उत्सुकता असताना १८ मे रोजी खोपोलीतील चंद्रविलास मंगल कार्यालयात या चित्रपटाचे टीझर सिनेमामध्ये भूमिका साकारणारे सिने कलाकार रोहन पाटील यांच्या हस्ते प्रदर्शित झाले आहे.

यावेळी सकल मराठा समाज समन्वयक डॉ.सुनील पाटील, विनोद साबळे, शंकरराव थोरवे, प्रभाकर देशमुख, किरण हडप, संकेत हडप, नितीन मोरे, तुळशीराम पाटील, भानुदास पालकर, प्रकाश पालकर, अनिल भोसले, राजेंद्र पाटील धनश्री दिवाणे, कविता पाटील आदी प्रमुख उपस्थित होते.

मराठा समाजाला आरक्षण मिळावा यासाठी अनेक आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या अनेक आंदोलनातून महाराष्ट्राला आदर्श घडवून दिल्याने त्यांच्या संघर्षमय जीवनाची अनेकांना उत्सुकता असताना मनोज जरांगे पाटील यांच्या जीवन प्रवास लवकरच रुपेरी पडद्यावर लवकरच दिसणार असून आहे. अभिनेता रोहन पाटील ‘संघर्षयोद्धा’ या चित्रपटामध्ये जरांगे पाटील यांची भूमिका साकारली असून गोवर्धन दोलताडे यांनी चित्रपटाची निर्मिती व शिवाजी दोलताडे यांनी दिग्दर्शन केले आहे.

## लक्ष्मीबाई गोपाळे यांचे निधन

**। रसायनी । वार्ताहर ।**

मोहोपाडा खानेआंबिवली येथील लक्ष्मीबाई गोपाळे यांचे राहत्या घरी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८५ होते. त्यांच्या पश्चात दोन मुले आणि एक मुलगी, सूना, जावई , नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर पराडे रसायनी येथील स्मशानभूमीवर अंत्यसस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी अध्यात्मिक, शैक्षणिक, राजकीय आदी क्षेत्रातील मान्यवर नागरिक उपस्थित होते.



# नेरळमध्ये उभारणार डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन: रामदास आठवले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

धर्मानंद गायकवाड आणि दिनेश गायकवाड यांच्या पश्चातदेखील या कुटुंबाचे नाव नेरळमध्ये कायम राहायला हवे. यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्याची जबाबदारी आम्ही घेतली आहे, असे आश्वासन केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री नामदार रामदास आठवले यांनी दिले.

भवनाचे काम अत्यंत जलदगतीने होण्यासाठी शासनाने तत्काळ कार्यवाही करावी अशी सूचना यावेळी केली. नेरळ येथे आरपीआय आठवले गटाचे कार्यकर्ते दिनेश गायकवाड यांच्या निधनाबद्दल कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी भेट दिली.

आरपीआय आठवले गटाचे युवक कोकण प्रदेश सचिव दिनेश गायकवाड यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी नेरळ येथे राजेंद्र गुरूनगर येथील निवासस्थानी आले होते. याप्रसंगी गायकवाड सुनील गायकवाड, सारिका गायकवाड, जॉय गायकवाड, शंतनु गायकवाड, वनिता आढाव, संजय आढाव, शोभा गायकवाड, राजूबाई गायकवाड, तारा जाधव, राहुल गायकवाड, छगन रोकडे, मुकेश आढाव, शिल्पा गायकवाड, प्रियंका जाधव आदी उपस्थित होते.

नेरळमध्ये ग्रामपंचायत सदस्य असताना धर्मानंद गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली होती. त्या जागेवर लवकरात लवकर भवनाचे काम पूर्ण व्हावे यासाठी शासकीय स्तरावर प्रयत्न व्हावेत अशी सूचना यावेळी केली. धर्मानंद गायकवड यांचे स्मारक व्हावे यासाठी त्यांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्याचे नामकरण करण्याची सूचना केली.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# कर्जत तालुक्यात पाणीटंचाईच्या झळा तीव्र

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत तालुक्यात दोन दिवस भरपूर पाऊस झाला असलातरी पाणीटंचाई कमी झाली नसून अधिक तीव्र झाली आहे. अवकाळी पावसामुळे उन्हाचा त्रासदेखील वाढला आहे. त्यामुळे पाण्याची मागणी वाढली असल्याने आता पाच टँकरमार्फत पाणीपुरवठा केला जात आहे.

अवकाळी पावसामुळे शेतामध्ये असलेल्या विहिरीपर्यंत टँकर पोहचत नाही आणि त्यामुळे आता रस्त्याच्या कडेला टँकर उभे करून पिंप आणि हंड्यांमध्ये पाणी झाले आहे. मात्र तालुक्यात पाणीटंचाई वाढली असून सध्या पाच टँकरमधून १९ आदिवासी वाड्या आणि नऊ गावांमध्ये टँकर जाऊन पाण्याची तहान भागवत आहेत. शासनाच्या टँकरमधून पिण्याचे पाणी पुरवले जात आहेत. साधारण १२ हजार लिटर क्षमतेचे पाण्याचे पाच टँकरमधून पाणीटंचाई ग्रस्त भागात दररोज तब्बल १० हजाराहुन अधिक लोकांना पाणी पुरवले जात आहे.

त्यात गेली काही दिवस झालेल्या अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात उन्हाची तीव्रता वाढली आहे. त्यामुळे टँकरग्रस्त गावांची संख्या वाढली असून शासनाचे अधिकारीदेखील निवडणुकीचा हंगाम संपल्याने तालुक्यात टंचाईची स्थिती पाहण्यासाठी फिरायला लागले आहेत.

कर्जत तालुक्यात अवकाळी पावसाने उष्णतेचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे आणखी काही ठिकाणी टँकर वाढविण्याची मागणी होऊ लागली आहे. सर्व शासकीय टँकरमध्ये जीपीआरएस यंत्रणा बसविण्यात आल्या आहेत.

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### ई-निविदा आमंत्रण सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने, उप मुख्य अभियंता (काम), रत्नागिरी, खालील कामासाठी पात्र कंत्राटदारांकडून IREPS पोर्टलवर ई-निविदाद्वारे सिंगल पॅकेट बिड प्रणालीमध्ये खुली निविदा आमंत्रित करीत आहेत. **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वे मार्गावरील वैभववाडी रोड स्टेशनमध्ये रेल्वे किमी 283/8-9 येथे अप्रोच रॅम्पसह फूट ओव्हर ब्रिज (3 मीटर रुंद, 4 लाईन स्टेशनसाठी) चे निर्माण. **निविदा सूचना क्र.:** केआर/आरएन/डीवायसीईडब्ल्यू/एफओबी/वीबीडब्ल्यू/03/24. **एकूण अंदाजे मूल्य:** ₹ 1.41 कोटी (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख:** 20.05.2024. **ऑनलाइन प्रस्ताव/बोली सादर करण्याची शेवटची तारीख/वेळ:** 10.06.2024 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **पूर्ण होण्याची कालावधी:** पावसाळ्यासह 09 महीने. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील / सहभागासाठी कृपया **https://ireps.gov.in** वेबसाइटला भेट द्या. आणि शुद्धिपत्र/ परिशिष्ट फक्त या वेबसाइटवर प्रकाशित केले जाईल.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, खालील प्रमाणे वर्णन केलेली शेत जमीन मिळकत हि मिळकती समोर लिहिलेल्या कब्जेदार/ मालक श्री चंद्रकांत जोमा पाटील यांचे कडून आमचे आशिल यांनी कायम खरेदी घेण्याबाबत मालकांन सोबत बोलणी व करार केलेला आहे. सदर मिळकतीचे ७/१२ उताऱ्या प्रमाणे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे अंतोरे, ता. पेण, जि. रायगड.**

| जमीन मालकाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ हे. आर. चौ. मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| श्री चंद्रकांत जोमा पाटील | १८/२ | ००-४०-३० पो.ख.००-०४-५० | ९.८१ |
| | | एकूण ००-४४-८० | |

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, अॅटेचमेंट, लीन, वैगरे कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही बोजाविरहीत आहे असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार मालकांन सोबतपूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. व त्या आमचे आशीलांचे लाभामध्ये सोडून दिलेल्या आहेत असे समजण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

पेण.
दि. १८/०५/२०२४

**श्री. नितीन हरिश्चंद्र पाटील**
ॲडव्होकेट
पाटील वाडा, महावीर मार्ग, पेण,
ता. पेण, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली शेत जमीन मिळकत हि मिळकती समोर लिहिलेल्या कब्जेदार / मालक श्री समीर सुभाष म्हात्रे यांचे कडून आमचे आशिल अंकुर ट्रस्ट तर्फे सचिव यांनी कायम खरेदी घेण्याबाबत मालकांन सोबत बोलणी व करार केलेला आहे. सदर मिळकतीचे ७/१२ उताऱ्या प्रमाणे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे धावटे, ता. पेण, जि. रायगड.**

| जमीन मालकाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ हे. आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री समीर सुभाष म्हात्रे | ४०/२ | ०१-०५-२० पैकी ००-२०-०० | १०.३९ |

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, अॅटेचमेंट, लीन, वैगरे कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही बोजाविरहीत आहे असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार मालकांन सोबतपूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. व त्या आमचे आशीलांचे लाभामध्ये सोडून दिलेल्या आहेत असे समजण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

पेण.
दि. १८/०५/२०२४

**श्री. नितीन हरिश्चंद्र पाटील**
ॲडव्होकेट
पाटील वाडा, महावीर मार्ग, पेण,
ता. पेण, जि. रायगड.

# शिक्षकांना दिलासा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

निवडणूक आयोगाने विधान परिषदेतील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाची निवडणूक स्थगित केली आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीचे मतदान झालेल्या जिल्ह्यांनी शिक्षक भरतीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांना तातडीने नियुक्ती देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

त्यामुळे शिक्षकांच्या नियुक्ती प्रक्रियेला आता गती मिळणार असून, निवड होऊनही नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांना दिलासा मिळणार आहे.

आता निवडणूक आयोगाने शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणुकीचे मतदान झालेल्या जिल्ह्यांनी निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिले.

नियुक्ती दिलेल्या शिक्षकांची माहिती सादर करण्याची सूचनाही देण्यात आली आहे.

## सिडको
शहरांचे शिल्पकार

### नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व दिपक काळूराम देशमुख, कैलास काळूराम देशमुख, उदय काळूराम देशमुख, अरूण काळूराम देशमुख, माणिक उर्फ मनीष मल्हारी पवार, जिजाबाई तुकाराम देशमुख, पूजा चंद्रकांत महाडिक, प्रमिला विजय बागराव, अशोक परशुराम देशमुख, पुष्पा सुरेश देशमुख, रेखा रमेश देशमुख, स्नेहल हरिभाऊ देशमुख, सिमा सतीष देशमुख, हेमंत खंडू चौधरी, राजेंद्र सुरेश देशमुख, शुभम सुभाष देशमुख, सुशांत सुभाष देशमुख, सतीश मनोहर देशमुख, संजय मनोहर देशमुख, लक्ष्मी मनोहर देशमुख, रेखा सुरेश गिजे, आरती पंकज फटागरे, अपुर्व राजेश देशमुख, आदिती राजेश देशमुख, राहणार-गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड -४१०२०६.

------- (अर्जदार)

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखित २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. ए. के. इरडामोर रियलटी तर्फे भागीदार कमरूद्दीन शुभानी पटेल, अझरूद्दीन कमरूद्दीन पटेल, मधुवेना रेड्डी अन्नापुरेड्डी, राजशेखररेड्डी अन्नापुरेड्डी रेड्डी, सिजु अब्राहम परायील, सिरील अब्राहम परायील यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| २८४६ | २९.०४.२०२४ | पुष्पक नोड | २६ | १४९ | ८७० | २२.०२.२०२४ | १४.०३.२०२४ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०२२/२०२४-२५

## शिक्षण सेवक पाहिजे
सिटीझन्स एज्युकेशन सोसायटी उरण जि. रायगड संचलित शाळा
सिटीझन्स प्रायमरी स्कूल उरण
१००% अनुदानित- अल्पसंख्यांक

| पदनाम | पदसंख्या (संचमान्यतेनुसार मान्य) | प्रवर्ग | पद-वर्ग | विषय | पद रिक्त होण्याचे कारण | शैक्षणिक व्यावसायिक अहर्ता | माध्यम | वयोगट | मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शिक्षण सेवक | ०१-पूर्णवेळ | खुला | १ ली ते ४ थी | सर्व विषय | राजीनामा दिल्याने रिक्त | H.S.C.D.T.Ed (उर्दू माध्यम) T.E.T./C.T.E.T. PAPER I उत्तीर्ण असणे आवश्यक | उर्दू | | शासन नियमाप्रमाणे |
| शिक्षण सेवक | ०१-पूर्णवेळ | खुला | १ ली ते ४ थी | सर्व विषय | राजीनामा दिल्याने रिक्त | S.S.C. (उर्दू माध्यम) H.S.C.D.T.Ed (इंग्रजी माध्यम) T.E.T./C.T.E.T. PAPER I उत्तीर्ण असणे आवश्यक | उर्दू | | शासन नियमाप्रमाणे |

टिप :- वर नमूद केल्याप्रमाणे इच्छुक उमेदवारांनी दिनांक २९ मे २०२४ पर्यंत शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेच्या छायांकित प्रमाणपत्र लेखी अर्जासह खालील दिलेल्या पत्त्यावर हस्तपोच किंवा पोस्टाने पाठवावे व एक प्रत contact@mycitizen.in या संकेतस्थळावर मेल करावे.

Address.Citizens Primary School, 320, Mohsin Bhaiji Marg Masjid Mohalla Uran Dist. Raigad
मो.नं. ९१६७२२५६७२

**अध्यक्ष/सचिव**
सिटीझन्स एज्युकेशन सोसायटी,
ता. उरण, जि. रायगड
पिन- ४००७०२

निवडक

## सुनील छेत्रीचे छायाचित्र

**झुरीच :** आंतरराष्ट्रीय फुटबॉल संघटनेने गुरुवारी क्रिस्टियानो रोनाल्डो, लिओनेल मेस्सी आणि सुनील छेत्री यांचा फोटो आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलद्वारे शेअर केला. त्यावर 'रिटायरिंग ॲज अलिजेंड' असे लिहिले आहे. भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार सुनील छेत्रीच्या सन्मानार्थ फिफाने हे छायाचित्र प्रसिद्ध केले आहे. पुढील महिन्यात आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधूननिवृत्ती घेणार असल्याचे छेत्रींनी गुरुवारी जाहीर केले आहे.

## कागिसो रबाडाचा समावेश

**दक्षिण आफ्रिका :** टी-२० विश्वचषकासाठी निवडलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या संघाबाबत वाद निर्माण झाला आहे. केवळ एका आफ्रिकन कृष्णवर्णीय खेळाडूचा संघात समावेश केल्याबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत. क्रिकेट दक्षिण आफ्रिकेवर टीका केली जात आहे. दक्षिण आफ्रिकेचे माजी क्रीडा मंत्री फिकिले म्बालुला, दक्षिण आफ्रिका क्रिकेट आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे माजी अध्यक्ष रे माली यांनीही दोन आफ्रिकन कृष्णवर्णीय खेळाडूंना स्थान न दिल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

## भारताचा एक सराव सामना

**मुंबई :** पुढील महिन्यात अमेरिका आणि वेस्ट इंडीजमध्ये खेळल्या जाणाऱ्या २० विश्वचषकापूर्वी टीम इंडिया एक सराव सामना खेळणार आहे. क्रिकबझच्या अहवालानुसार, बीसीसीआयला भारताचा सराव सामना न्यूयॉर्कमध्ये आयोजित करायचा आहे. कारण संघ न्यूयॉर्कच्या स्टेडियममध्ये चार ग्रुप स्टेजमधील सामने खेळणार आहे. आयसीसीने अद्याप सराव सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केलेले नाही. इंग्लंड आणि पाकिस्तान हे दोन सराव सामने खेळण्याची शक्यताही कमी आहे.

## बांगलादेशाचा संघ जाहीर

**बांगलादेश :** बांगलादेशने पुढील महिन्यात अमेरिका आणि वेस्ट इंडिज येथे होणाऱ्या २० विश्वचषक स्पर्धेसाठी १५ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. बांगलादेश बोर्डाने मंगळवारी ही घोषणा केली. नजमुल हुसेन शांतो हा विश्वचषकात संघाचे नेतृत्व करणार आहे. शांतोला या वर्षाच्या सुरुवातीला सर्व फॉरमॅटमध्ये बांगलादेशचा कर्णधार बनवण्यात आले होते. अनुभवी अष्टपैलू शाकिब अल हसनचाही संघात समावेश करण्यात आला आहे. शाकिब २००७ च्या सुरुवातीपासून प्रत्येक टी-२० विश्वचषकात खेळला आहे.

## भारताला पाहीजे प्रशिक्षक

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने वरिष्ठ पुरुष भारतीय क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकासाठी अर्ज आमंत्रित केले आहेत. सध्या राहुल द्रविड भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक आहेत. द्रविड यांचा कार्यकाळ जूनमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषक २०२४ नंतर संपणार आहे. भारतीय क्रिकेट संघाच्या नवीन मुख्य प्रशिक्षकासाठी अनेक नावे पुढे येत आहेत. त्यामध्ये गौतम गंभीर आणि स्टीफन फ्लेमिंगसारख्या दिग्गजांच्या नावांचा समावेश आहे.

### प्लेऑफ्ससाठी पात्र ठरून चेन्नईचा पराभव

# आरसीबीने रचला इतिहास

## आयपीएलमध्ये 'हा' पराक्रम करणारा ठरला पहिला संघ

। मुंबई । प्रतिनिधी ।

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने चेन्नई सुपर किंग्जला शेवटच्या साखळी सामन्यात धूळ चारुन प्लेऑफमध्ये स्थान पक्के केले आहे. प्लेऑफ्समध्ये पोहोचण्यासाठी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुला चेन्नई सुपर किंग्जचा १८ किंवा त्याहून अधिक धावांच्या फरकाने पराभव करायचा होता. मात्र, आरसीबीने सीएसकेचा २७ धावांनी धुव्वा उडवत प्लेऑफ्समध्ये धडक मारली. यासह आता आयपीएलच्या इतिहासात आरसीबीच्या नावावर एक मोठा विक्रम नोंदवला गेला आहे.**




आयपीएलच्या १७ व्या मोसमात प्लेऑफमध्ये स्थान मिळवणारे चारही संघ निश्चित झाले आहेत. ज्यामध्ये कोलकाता नाईट रायडर्स, सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्सने आधीच स्थान मिळवले होते. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघासाठी लीग टप्प्यातील सामन्यांचा सुरुवातीचा टप्पा खूपच खराब होता. ज्यामध्ये त्यांना पहिल्या सात सामन्यांपैकी फक्त एकच सामना जिंकता आला होता. यानंतर, आरसीबीने आयपीएल २०२४ च्या उत्तरार्धात शानदार पुनरागमन केले आणि पुढील सात पैकी सहा सामने जिंकून प्लेऑफमध्ये आपले स्थान निश्चित केले. यासह, आरसीबी आयपीएलच्या इतिहासातील पहिल्या सात सामन्यांपैकी केवळ एक सामना जिंकून प्लेऑफसाठी पात्र ठरणारा पहिला संघ ठरला आहे. आरसीबी संघाला आता २२ मे रोजी प्लेऑफमध्ये आपला पुढील सामना खेळायचा आहे. जो एलिमिनेटर सामना असेल आणि तो अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियम वर खेळला जाईल. या सामन्यात आरसीबीचा सामना राजस्थान रॉयल्स किंवा सनरायझर्स हैदराबाद संघाशी होऊ शकतो.

**प्लेऑफ्समधील आरसीबीची आतापर्यंतची कामगिरी**

आयपीएलच्या इतिहासात नव्यांदा आरसीबी संघाने प्लेऑफमध्ये आपले स्थान पक्के केले आहे. याआधी, जेव्हा संघ आठ वेळा प्लेऑफ्समध्ये पोहोचला आहे. तेव्हा तो केवळ तीन वेळा अंतिम फेरीत पोहोचू शकला आहे. या तिन्हींमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. पाच वेळा संघाचा प्रवास प्लेऑफ सामन्यांमध्ये पराभवाने संपला. २०१६ च्या मोसमात आरसीबी संघ आयपीएल फायनलमध्ये पोहोचला होता. ज्यामध्ये त्यांना सनरायझर्स हैदराबादकडून आठ धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता.

**शेवटच्या षटकात यश दयालची निर्णायक गोलंदाजी**

पहिल्या चेंडूवर धोनीने फाइन लेगवर जोरदार शॉट खेळला आणि ११० मीटरचा षटकार मारला. आता संघाला पाच चेंडूत ११ धावांची गरज होती. पण पुढच्याच चेंडूवर धोनी स्वप्नील सिंगच्या हाती झेलबाद झाला. त्यानंतर शार्दुल ठाकूर फलंदाजीला आला. तिसऱ्या चेंडूवर एकही धाव आली नाही. आता सीएसके संघाला तीन चेंडूत ११ धावांची गरज होती. चौथ्या चेंडूवर शार्दुलने थर्ड मॅनच्या दिशेने शॉट खेळला आणि एक धाव घेतली. आता चेन्नईला प्लेऑप्समध्ये पात्र ठरण्यासाठी दोन चेंडूत १० धावांची गरज होती. जडेजा क्रीजवर स्ट्राइकवर होता. दयालने ओव्हरच्या शेवटचे दोन्ही चेंडू डॉट्स टाकले. ज्यामुळे आरसीबीच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले.

## मास्टर ब्लास्टरचे मतदारांना आवाहन

। मुंबई । प्रतिनिधी ।



एखाद्या सामन्यामध्ये प्रेक्षकांचा आवडता संघ नेहमीच जिंकेल असे काही नाही. पण, लोकशाहीत हे असेच घडत असते. अर्थात लोकांनी ज्याला सर्वाधित मतदान केले असते त्याचा विजय होत असतो. म्हणूनच आपण लोक म्हणून किती सामर्थ्य आहे हे दाखवूया... चला मतदान करूया, असे आवाहन भारतीय संघाचा माजी खेळाडू, मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने त्याच्या शैलीत मतदारांना केले आहे.

सध्या सर्वत्र लोकसभा निवडणुकीचे वारे वाहत आहेत. सोमवारी २० मे रोजी देशभरात पाचव्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया पार पडत आहे. हा टप्पा राज्यातील शेवटचा असून, यामध्ये मुंबईतील सर्व सहा जागांचा समावेश आहे. जास्तीत जास्त लोकांनी मतदान करावे यासाठी निवडणूक आयोगापासून राजकीय पक्ष काम करत आहेत. नवमतदारांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी आयोगाकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे.

**पाचव्या टप्प्यात कोणकोणती राज्ये**

बिहार (५), झारखंड (३), महाराष्ट्र (१३), ओडिशा (५), उत्तर प्रदेश (१४), पश्चिम बंगाल (७), जम्मू-काश्मीर (१) लडाख (१)

दरम्यान, सोमवारी पाचव्या टप्प्यात राज्यातील १३ जागांसाठी मतदान होत आहे. यामध्ये मुंबईच्या सहा आणि ठाणे, कल्याण तसेच नाशिकसारख्या प्रतिष्ठित जागांचा समावेश आहे. पहिल्या चार टप्प्यात मतदान घटल्याचे पाहायला मिळाले. याचा फटका कोणाला बसतो हे येत्या ४ जून रोजी स्पष्ट होईल. त्यामुळे अधिकाधिक मतदान होण्यासाठी आयोगासह उमेदवार आणि राजकीय पक्ष देखील कामाला लागले आहेत.

## मार्क बाऊचरने केली हार्दिक पंड्याची पाठराखण

। मुंबई । प्रतिनिधी ।

यंदाच्या हंगामात हार्दिक पंड्याला बऱ्याच आव्हानांना सामोरे जावे लागले. त्याच्याविरोधात सतत शेरेबाजी झाली आणि हे पाहून मला हार्दिकसाठी खूप वाईट वाटले. मैदानाबाहेरील विविध गोष्टींचा केवळ हार्दिक नाही, तर आमच्या संपूर्ण संघाच्याच कामगिरीवर परिणाम झाल्याचे मुंबई इंडियन्सचा मुख्य प्रशिक्षक मार्क बाऊचरने नमूद केले.



मुंबईच्या संघाला शुक्रवारी झालेल्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटच्या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सकडून १८ धावांनी पराभव पत्करावा लागला. हार्दिक पंड्याच्या नेतृत्वाखालील मुंबईच्या संघाने यंदाच्या 'आयपीएल' हंगामात अत्यंत निराशाजनक कामगिरी केली. एकूण १४ पैकी १० सामन्यांत त्यांना हार पत्करावी लागली. त्यामुळे मुंबईचा संघ गुणतालिकेत तळाला राहिला. यंदाच्या हंगामाला सुरुवात होण्यापूर्वी रोहित शर्माला कर्णधारपदावरून हटवून हार्दिककडे नेतृत्वाची धुरा सोपवण्याचा मुंबई इंडियन्सच्या व्यवस्थापनाने निर्णय घेतला. रोहितच्या नेतृत्वाखाली मुंबईने पाच वेळा 'आयपीएल'चे जेतेपद पटकावले आहे. त्यामुळे त्याला कर्णधारपदावरून हटवण्याचा निर्णय मुंबईच्या चाहत्यांना आवडला नाही. त्यांनी आपली नाराजी समाजमाध्यमे आणि प्रत्यक्ष स्टेडियममध्ये हार्दिकविरोधात शेरेबाजी करत व्यक्त केली.

हार्दिकच्या भोवती बऱ्याच गोष्टी सुरू होत्या. याचा त्याच्या निर्णयक्षमतेवर काहीसा परिणाम झाला. त्याला केवळ क्रिकेटवर लक्ष केंद्रित करता येत नव्हते. कर्णधार म्हणून त्याला बऱ्याच आव्हानांना सामोरे जावे लागले. आमच्या ड्रेसिंग रूममध्ये त्याला सर्वांकडूनच खूप पाठिंबा मिळाला. आमचे सर्वच खेळाडू त्याला मदत करण्याचा प्रयत्न करत होते. मात्र, सतत विरोधात शेरेबाजी होत असल्यास खेळाडू म्हणून काम खूप अवघड होऊन जाते. आता आम्हाला काही गोष्टींचा विचार करावा लागणार आहे, जेणेकरून भविष्यात पुन्हा अशी परिस्थिती उद्भवू नये, असे बाऊचर म्हणाला.

यंदाच्या हंगामात अपेक्षित कामगिरी करण्यात अपयश आले असले, तरी हार्दिकच्या नेतृत्वक्षमतेवर आपला पूर्ण विश्वास आहे तो म्हणाला. संघाच्या कामगिरीचे पुनरावलोकन केले जाईल. मात्र, कोणताही भावनिक निर्णय घेतला जाईल असे मला वाटत नाही. हार्दिकच पुढे कर्णधार म्हणून हवा असेल याची मला खात्री आहे. आम्ही काही काळानंतर याबाबत सखोल चर्चा करू, असेही बाऊचरने सांगितले. मुख्य प्रशिक्षक म्हणून आपले पदही धोक्यात येऊ शकते याची बाऊचरला जाणीव आहे.

## विराट कोहली षटकार किंग

**मुंबई :** आयपीएल २०२४ मध्ये चौकार आणि षटकारांचा पाऊस पडत आहे. आतापर्यंत १००० पेक्षा जास्त षटकारांची नोंद झाली आहे. यंदाच्या हंगामात सर्वाधिक षटकारांचा विक्रम विराट कोहलीच्या नावावर आहे. विराट कोहली याने आतापर्यंत ३७ षटकार ठोकले आहेत. विराट कोहलीने निकोलस पूरन आणि अभिषेक शर्मा यांना मागे टाकले आहे. विराट कोहलीने यंदाच्या हंगामात सर्वाधिक षटकार ठोकण्याचा पराक्रम केला आहे. निकोलस पूरन दुसऱ्या क्रमांकावर आहे. पूरनच्या नावावर ३६ षटकार आहेत.

## एलोर्डा चषक बॉक्सिंग स्पर्धा निकहत, मीनाक्षीचे सुवर्णयश

### भारताने कमावली १२ पदके

। अस्ताना । वृत्तसंस्था ।

जागतिक विजेती निकहत झरीन (५२ किलो) आणि मीनाक्षी (४८ किलो) या भारताच्या महिला बॉक्सिंगपटूंनी एलोर्डा चषक स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. भारताने या स्पर्धेतील आजवरची सर्वोत्तम कामगिरी करताना यंदा १२ पदके मिळवली. यात दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि आठ कांस्यपदकांचा समावेश होता. त्यामुळे भारताला गेल्या स्पर्धेतील पाच पदकांचा विक्रम मोडता आला.




निकहतने ५२ किलो वजनी गटातील आपले वर्चस्व पुन्हा सिद्ध करताना कझाकस्तानच्या झझीरा उरकाबायेवाला ५-० असे निष्प्रभ केले. त्यापूर्वी मीनाक्षीने भारताला दिवसाची यशस्वी सुरुवात करुन देताना ४८ किलो वजनी गटात उझबेकिस्तानच्या रहमोनोवा सैदाहोनला ४-१ असे पराभूत केले आणि सुवर्णपदक मिळवले. अनामिका (५० किलो) आणि मनीषा (६० किलो) यांना अंतिम फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. अनामिकाने झुंज देण्याचा प्रयत्न केला. पण तिला जागतिक आणि आशियाई विजेत्या चीनच्या वू यूकडून १-४ अशी हार पत्करावी लागली. मनीषाला कझाकस्तानच्या व्हिक्टोरिया ग्राफिवाने ०-५ असे पराभूत केले.

## शर्माजी का बेटा... चिअर करणार




। मुंबई । प्रतिनिधी ।

आयपीएल २०२४ नंतर भारतीय खेळाडू ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेसाठी अमेरिकेला रवाना होणार आहेत. अशा वेळेस लोकेश राहुलला आता तू काय करणार असे विचारण्यात आले. त्यावर त्याने मन जिंकणारे उत्तर दिले. तो म्हणाला, मी माझ्या सासऱ्यांचा आवडता खेळाडू शर्मा जी का बेटा याच्यासाठी चिअर करणार. आयपीएलपूर्वी एका बेटिंग ॲपने जाहिरात बनवली होती, त्यात सुनील शेट्टी हे रोहितच्या बाजूने असलेले दाखवण्यात आले. त्याचा आधार घेत लोकेशने ही कमेंट केली.

मुंबई इंडियन्सविरुद्ध विजय मिळवून त्यांनी स्पर्धेचा निरोप घेतला. आयपीएलमध्ये पहिल्यांदाज लखनौचा संघ प्ले ऑफसाठी पात्र ठरू शकला नाही. लोकेश राहुलच्या नेतृत्वाखाली लखनौ सुपर जायंट्चने १४ पैकी ७ सामने जिंकून सहाव्या क्रमांकासह स्पर्धेचा निरोप घेतला. लोकेशला या स्पर्धेत केवळ नेतृत्वात अपयश आले नाही, परंतु त्याने फलंदाजीत कमाल दाखवली. तरीही ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेसाठीची त्याची टीम इंडियाची बस चुकली.

लोकेशने १४ सामन्यांत ५२० धावा केल्या, परंतु त्याच्या स्ट्राईक रेट हा १३६.१२ असा असल्याने त्याचा वर्ल्ड कपसाठी विचार केला गेला नसावा असा अंदाज आहे. आयपीएल २०२४ नंतर भारतीय खेळाडू ट्वेंटी-२०वर्ल्ड कप स्पर्धेसाठी अमेरिकेला रवाना होतील. दोन बॅचमध्ये भारतीय संघ अमेरिकेत दाखल होणार आहेत. पहिली बॅच २५ मे रोजी निघेल असा अंदाज आहे. आयपीएलच्या प्ले ऑफमध्ये पात्र न ठरलेल्या संघातील खेळाडू ज्यांची वर्ल्ड कपसाठी निवड झाली आहे. ते पहिल्या बॅचमध्ये असतील.

सामन्यात काय झालं?

नाणेफेक जिंकल्यानंतर मुंबई इंडियन्सने प्रथम गोलंदाजी स्वीकारली. लोकेश राहुल (५५ धावा) आणि निकोलस पूरन (७५ धावा) यांच्या फटकेबाजीने संघाला ६ बाद २१४ धावांपर्यंत पोहोचवले.

लक्ष्याचा पाठलाग करताना रोहित शर्मा ( ६८ धावा) आणि डेवाल्ड ब्रेव्हिस ( २०) यांची ८८ धावांची भागीदारी तुटल्यानंतर मुंबईच्या फलंदाजांनी रांग लावली. नमन धीरच्या (२८ चेंडूत ६२* धावा, ४ चौकार आणि ५ षटकार) जबरदस्त खेळीमुळे मुंबईला आशा दाखवली होती. पण, त्यांची १८ धावेने हार झाली. मुंबईला ६ बाद १९६ धावाच करता आल्या.

## पॅरिस ऑलिम्पिकसाठी भारतीय टेबल टेनिस संघाची घोषणा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

कॉमनवेल्थ गेम्स चॅम्पियन शरथ कमल आणि मनिका बत्रा पॅरिस ऑलिम्पिकसाठी सहा सदस्यीय भारतीय टेबल टेनिस संघाचे नेतृत्व करतील. भारतीय टेबल टेनिस महासंघाने गुरुवारी संघाची घोषणा केली.

सहा सदस्यीय संघात जी साथियानला स्थान मिळालेले नाही. साथियानला पुरुष संघात राखीव खेळाडू म्हणून स्थान मिळाले आहे. पॅरिसमध्ये भारतीय खेळाडू एकेरी आणि सांघिक स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत. अहिका मुखर्जी महिला संघाची राखीव खेळाडू असेल. पॅरिस ऑलिम्पिकसाठी भारतीय टेबल टेनिस संघ

पुरुष संघ : शरथ कमल, हरमीत देसाई, मानव ठक्कर.

राखीवः जी साथियान.

महिला संघ : मनिका बत्रा, श्रीजा अकुला, अर्चना कामथ.

राखीवः अहिका मुखर्जी.

पुरुष एकेरीः शरथ कमल, हरमीत देसाई.

महिला एकेरीः मनिका बत्रा, श्रीजा अकुला.

**ऑलिम्पिकमध्ये तंत्रज्ञानाचा वापर**

**पॅरिस ऑलिम्पिकला केवळ अडीच महिने उरले आहेत. यावेळी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती क्रीडा सुरक्षेपासून मनोरंजनापर्यंत सर्व गोष्टींमध्ये एआयचा वापर करणार आहे. याअंतर्गत खेळाडूंच्या कुटुंबीयांच्या भावनांवर लक्ष ठेवले जाणार आहे. त्याच वेळी, रेफ्रींना वास्तविक वेळेच्या विश्लेषणाद्वारे मदत केली जाईल. पॅरिसमध्ये झालेल्या १९२४ ऑलिम्पिकच्या छायाचित्रांना रंगीत करण्याचीही योजना आहे. पॅरिस ऑलिम्पिक २६ जुलै ते ११ ऑगस्ट दरम्यान होणार आहे.**

## टॉमच्या क्यूब कॉलरच्या गॅझेटने वेधले लक्ष

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

**टॉम कोहलर-कॅडमोरने बुधवारी आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सकडून पदार्पण केले. पदार्पणाच्या सामन्यात त्याच्या खेळाने छाप पाडण्यात तो फारसा यशस्वी ठरला नाही, पण त्याच्या गळ्यातील गॅजेटने स्टेडियममध्ये बसलेल्या चाहत्यांपासून ते टीव्हीवरील प्रेक्षकांपर्यंत सर्वांनाच आकर्षित केले.**

वास्तविक टॉमने क्यू कॉलर नावाचे उपकरण घातले होते. क्यू कॉलर खेळाडूंना डोक्याच्या दुखापतींपासून वाचवते आणि त्यांचा प्रभाव कमी करते. क्यू कॉलर म्हणजे काय ते जाणून घेऊया?

**क्यू कॉलर डिव्हाइस म्हणजे काय? हे कसे काम करते?**

हे गळ्यात घालण्याचे उपकरण आहे. हे मानेच्या एका विशिष्ट मज्जातंतूवर दाब देते. त्यामुळे डोक्यातील रक्तप्रवाह वाढतो आणि ते रक्त डोक्यात राहते. यामध्ये, रक्त एक प्रकारचे अतिरिक्त संरक्षणात्मक स्तर म्हणून कार्य करते, ज्यामुळे डोक्याच्या दुखापतीचा प्रभाव कमी होतो.

**क्यू कॉलरची कल्पना कशी सुचली?**

अमेरिकेतील डॉ. डेव्हिड स्मिथ (इंटर्नल मेडिसिन) यांना वुडपीकरचे निरीक्षण केल्यानंतर




क्यू कॉलरची कल्पना सुचली. वूडपीकर जेव्हा आपल्या चोचीने झाडाच्या खोडात छिद्र पाडतो तेव्हा त्याची मान नैसर्गिकरित्या आकुंचन पावते. त्यामुळे मानेतील संपूर्ण रक्तप्रवाह थांबतो. त्यामुळे लाकूडतोड्याच्या चोचीवरील वार डोक्यापर्यंत पोहोचत नाही. हे पाहून डॉ.स्मिथ यांनी क्यू कॉलरची रचना केली.

**क्यू कॉलर हे खेळातील इतर हेल्मेटपेक्षा वेगळे कसे आहे?**

इतर कोणत्याही खेळासाठी पारंपरिक हेल्मेट डोक्याला दुखापतीपासून वाचवतात. तर क्यू कॉलर उपकरण डोक्याच्या दुखापतींचा प्रभाव कमी करण्यावर लक्ष केंद्रित करते.

**क्यू कॉलरबद्दल डॉक्टरांचे काय म्हणणे आहे?**

मानसोपचार शास्त्राचे प्राध्यापक. मार्था शेंटन आणि फिजियोलॉजीचे प्रोफेसर जेम्स स्मोलिगा यांचा असा विश्वास आहे की क्यू-कॉलरचे संशोधन दाव्यांशी पूर्णपणे जुळत नाही. जेम्सचा असा विश्वास आहे की क्यू-कॉलरच्या अप्रमाणित दाव्यांमुळे, खेळाडू त्यांच्या डोक्याचे संरक्षण करण्याऐवजी अधिक जोखीम घेतील. ज्यामुळे आघात (डोके दुखापत) होण्याचा धोका वाढू शकतो. डॉक्टरांच्या विरोधाला न जुमानता यूएस फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशनने या उपकरणाला वैद्यकीय उपकरण म्हणून मान्यता दिली आहे.

**कोणत्या खेळात क्यू कॉलर वापरले जातात?**

रग्बी, अमेरिकन फुटबॉल, कॉलेज स्पोर्ट्स आणि युरोपियन फुटबॉलमध्ये जगभरात क्यू कॉलर मोठ्या प्रमाणावर वापरले जात आहेत. क्यू कॉलर बनवणाऱ्या कंपनीने दावा केला आहे की, ते न्यूरॉन्स आणि ॲक्सॉनचा धोका ८३% कमी करते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)